cmyk

### संपादकीय

## स्कूल बस नियमावली कागदावर नको

शालेय विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी स्कूल बससाठी येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून नवी नियमावली निश्चित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमली आहे. पुढील एका महिन्याच्या कालावधीत ही समिती आपला अहवाल परिवहन खात्याला सादर करणार आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर जी नियमावली तयार होईल, त्याची अंमलबजावणी फक्त कागदावर राहायला नको आहे, अशी भावना मात्र पालकवर्गाची झाली आहे. या आधी राज्य सरकारच्या वतीने २०११ साली स्कूल बस नियमावली जारी केली होती.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३०५ | गुरूवार, दि.२७ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# महाराष्ट्राप्रमाणे अमेरिकन शेतकऱ्यांचेही कंबरडे मोडले

## कापसाची लागवड कमी होणार; उत्पादन खर्चही निघाला नाही

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

गेल्या अनेक वर्षापासून भारतात कापसाची लागवड केली जाते, महाराष्ट्रात विदर्भ आणि मराठवाड्यात कापसाचे मोठे क्षेत्र असून यंदा कापसाचा खर्चही शेतकऱ्यांना निघाला नाही. तसेच अमेरिकेतील कापूस उत्पादकांनाही यंदा पीक आतबट्ट्याचे ठरत आहे. उत्पादन खर्च न निघाल्यामुळे तेथे आता कापसाचे क्षेत्र घटणार आहे.



महाराष्ट्रात कापसाला यंदा चांगला भाव मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती, मात्र भाव न मिळाल्याने खर्चही निघाला नाही. तशीच परिस्थिती यंदा अमेरिकेत आहे. यंदा कापसाचा उत्पादन खर्चही भरून निघाला नाही. सरकारचाही अपेक्षित आधार कापूस उत्पादकांना मिळला नाही. त्यामुळे २०२५ मध्ये अमेरिकेतील शेतकरी कापसाची १४.५ टक्क्यांनी लागवड कमी करतील, असा अंदाज अमेरिकेच्या नॅशनल कॉटन काऊंसीलने व्यक्त केला.

जागतिक पातळीवर २०२४ हे वर्ष कापूस उत्पादकांसाठी तोट्याचे ठरत आहे. अमेरिकेच्या कापूस उत्पादकांचं अर्थकारण कोलमडले आहे. अनेक अडचणींचा सामना कापूस उद्योगाला करावा लागला. महत्वाचे म्हणजे कापसाचे भाव यंदा पडले आहेत. दुसरीकडे कापसाचा उत्पादन खर्चही वाढला आणि मागणीही कमी राहीली. या सर्व घडामोडींमुळे अमेरिकेतील कापूस उत्पादकांचे अर्थकारण कोलमडले. चालू हंगामात कापूस उत्पादकांचा उत्पादन खर्चही भरून निघाला नाही. त्यामुळे २०२५ मध्ये कापूस लागवड कमी करणार असल्याचे अमेरिकेतील शेतकऱ्यांनी कळवले आहे, असे नॅशनल कॉटन काऊंसीलने म्हटले आहे.

### ..तर भारतात पुढच्या वर्षी कापसाला चांगला भाव?

अमेरिकेत पुढील वर्षी जर कापसाची लागवड कमी झाली तर त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय बाजारावर होऊन भारतात कापसाला चांगला भाव मिळू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

चालू हंगामात अमेरिकेच्या बाजारात कापसाला सरासरी ७० सेंट प्रतिपाऊंडपेक्षा कमी भाव मिळाला. मागच्या दोन महिन्यांपासून बाजार ६८ सेंटच्या खाली दिसतो आहे. चालू हंगामात कमी भाव मिळाला. उत्पादन खर्चही भरून निघाला नाही. त्यामुळे आम्ही कापूस लागवड कमी करणार. मका आणि सोयाबीनच्या तुलनेत कापसाचे भाव कमी राहीले. इतर पिकांच्या तुलनेत कापसातून मिळालेला परतावा कमी होता, असे शेतकऱ्यांनी सांगितल्यचेही अमेरिकेच्या नॅशनल कॉटन काऊंसीलने म्हटले आहे. अमेरिकेत कापसाचे उत्पादन होते त्या तुलनेत वापर कमी होतो. अमेरिकेचा कापूस मोठ्या प्रमाणात निर्यात केला जातो. पण महत्वाच्या ग्राहक देशांमध्ये कापसाची मागणी यंदा कमी आहे. जागतिक पातळीवर आर्थिक समस्या असल्याने मागणी पान २ वर

## पंजाबच्या गव्हामुळे केस गळती

बुलढाणा । प्रतिनिधी

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात केस गळतीच्या प्रकरणात एक धक्कादायक सत्य समोर आले आहे. संशोधक डॉ. हिम्मतराव बावस्कर यांच्यानुसार, पंजाब आणि हरियाणातील शिवालिक टेकड्यांमधून आलेल्या रेशनच्या गव्हामुळे ही केसगळती झाली आहे.


बुलढाण्याच्या केस गळती प्रकरणात आता मोठी अपडेट समोर आली आहे. बुलढाण्याच्या शेगावमधील काही गावांमध्ये लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सगळ्यांचे केस गेल्या काही महिन्यांपासून अचानक गळायला सुरुवात झाली आहे. याप्रकरणी संशोधक डॉ. हिम्मतराव बावस्कर यांनी शोध घेतला असता एक धक्कादायक कारण समोर आले आहे. बुलढाण्यातली केस गळती प्रकरणाचा थेट संबंध पंजाब आणि पान २ वर

# अन्नत्यागला यश; उज्वल निकम यांची नेमणूक

## संतोष देशमुख खून प्रकरण: मस्साजोगकरांचे आंदोलन तुर्तास स्थगित

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात फडणवीस सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र सरकारतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून, तर ॲड. बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी त्याबाबत ट्विट करत माहिती दिली आहे. तसेच सात पैकी एक मागणी मान्य केल्याने मस्साजोगकरांनी तुर्तास अन्नत्याग आंदोलन मागे घेतले आहे.



धनंजय देशमुख हे मस्साजोगच्या ग्रामस्थांसह अन्न त्याग आंदोलनाला बसले आहे. आजचा त्यांचा आंदोलनाचा दुसरा दिववस आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला ७८ जिवस पूर्ण होऊन न्याय मिळाला नाही. या न्यायासाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनातील एक मागणी सरकारने मान्य केली आहे. त्यामुळे प्रशासन आणि शासनाच्या मागण्यांबाबत अनुकुलता असल्याने अन्नत्याग आंदोलन मागे घेतले आहे.

उज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली ही समाधानाची बाब, मात्र आंदोलन केल्या नंतरच सरकार मागण्या मान्य करतय अशी प्रतिक्रिया संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी दिली आहे. उज्वल निकम यांच्या नियुक्तीनंतर धनंजय देशमुख यांनी दिलेली ही प्रतिक्रिया आहे.

बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी धनंजय देशमुख यांच्याशी फोनवरुन संवाद साधला. पोलीस अधीक्षक कॉवत यांनी धनंजय देशमुख यांना आंदोलन स्थगित करण्याची फोनवर विनंती केली आहे. या प्रकरणातील कृष्णा आंधळे हा आरोपी फरारच आहे.

### पीआय प्रशांत महाजन, राजेश पाटलांना सहआरोपी करा–आ. धस

आ. सुरेश धस यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन चर्चा केली. संतोष देशमुख यांचा मृतदेह नेणारी गाडी पीएसआय राजेश पाटील हे कळंबच्या दिशेने कोणाच्या सांगण्यावरून घेऊन जात होते याची चौकशी करावी. तसेच पीआय प्रशांत महाजन व पीएसआय राजेश पाटील यांना बडतर्फ करुन त्यांना सहआरोपी करण्याची मागणी आ. सुरेश धस यांनी केली आहे. यासह मस्साजोगकरांच्या सर्व मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी पत्र पाठवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

### उज्वल निकम न्याय देऊ शकतील का?–आ. आव्हाड

संतोष देशमुख हत्या प्रकरणी उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली आहे. निकम हे भाजपचे सदस्य असल्याने जितेंद्र आव्हाड यांनी या नियुक्तीवर शंका उपस्थित केली आहे. उज्वल निकम न्याय देऊ शकतील का? असा सवाल जितेंद्र आव्हाडांनी केला आहे.

### संतोष देशमुखांची हत्या लाईव्ह कोणी बघितली?–खा. सोनवणे

संतोष देशमुख यांची हत्या होत असताना लाईव्ह बघितली जात होती, असा गंभीर आरोप खा. बजरंग सोनवणे यांनी केला आहे. मंगळवारी मस्साजोग येथे सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनात त्यांनी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. माध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेत बजरंग सोनवणे यांनी आरोपींच्या फोनची सिडिआर चौकशी व्हावी अशी देखील मागणी केली आहे. तसेच संतोष देशमुख यांना मारत असताना हा सर्व प्रकार लाईव्ह बघितला जात होता, ही अंगावर शहारे आणणारी घटना आहे, असा खळबळजनक खुलासा यावेळी बजरंग सोनवणे यांनी केला आहे.

## महाशिवरात्रीनिमित्त अंघोळीसाठी गेलेले सहा जण बुडाले

चंद्रपूर । प्रतिनिधी

दोन विविध घटनात महाशिवरात्रीनिमित्त अंघोळीसाठी गेलेले सहा बुडाल्याची घटना चंद्रपुर जिल्ह्यात उघडकीस आली आहे. पहिल्या घटनेत तर तीन सख्या बहिणींचा पोहताना दुर्दैवी अंत झाला आहे. तर दुसऱ्या घटनेत आणखी तिघा तरुण मित्रांचा बुडून मृत्यू झाला आहे.

चंद्रपूर येथे महाशिवरात्रीनिमित्त नदीवर अंघोळीसाठी कुटुंबियासोबत गेलेल्या तीन सख्ख्या बहिणींचा वैनगंगा नदीत बुडून दुर्दैवी अंत झाल्याची घटना बुधवारी घडली. यापैकी एकीचा मृतदेह सापडला असून दोघींचा शोध सुरू आहे. महाशिवरात्री निमित्त बुधवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास चंद्रपूर येथील प्रकाश मंडल हे आपल्या कुटुंबातील आठ जणांसह गडचिरोली मार्गावरील व्याहाड येथील वैनगंगा नदीच्या पात्रात अंघोळीसाठी पान २ वर

### चंद्रपुर जिल्ह्यातील घटना; तीन सख्या बहिणींचा दुर्दैवी अंत

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३०.०० क्विंटल | २,८०२ | ३,३५८ | ३,२११ |
| ज्वारी/हायब्रिड: १३६.००क्विंटल | १,८०० | ३,६५० | २,४०४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ४३.५० क्विंटल | ७,००१ | ७,३८१ | ७,१७१ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,३०० | ३,३०४ | २,८४३ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ३,६०० | ४,००० | ३,८४३ |
| हरभरा:५.५० क्विंटल | ५,२६० | ५,३०० | ५,२८० |

## महाशिवरात्रीनिमित्त वैद्यनाथ मंदिरात भाविकांची गर्दीच गर्दी





परळी । प्रतिनिधी


बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या परळीतील श्री वैद्यनाथ मंदिरात महाशिवरात्री निमित्त भाविकांनी मोठी गर्दी केली. प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी देशभरातून शिवभक्त परळी वैजनाथ येथे दाखल झाले होते. दर्शनासाठी देवस्थानकडून प्रतिवर्षीप्रमाणेच शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले होते. दि.२६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीनिमित्त मुखामध्ये शिवनाम व हातमध्ये बेलपान घेऊन लाखो भाविकांनी प्रभु वैद्यनाथाचे पान २ वर

## पुण्यात भल्या पहाटे बसमध्ये तरुणीवर बलात्कार

### बसस्थानकातील घटना; अजित पवारांनी दिले चौकशीचे आदेश

पुणे । प्रतिनिधी

स्वारगेट बस स्थानकामध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर अत्याचार झाल्याची घटना सोमवारी पहाटे घडली आहे. स्वारगेट एसटी स्टँड परिसरात घडलेल्या या घटनेने पुणे हादरले आहे. नराधम आरोपी दत्तात्रय गाडे हा सराईत गुन्हेगार असून त्याने जीवे मारण्याची धमकी देत त्याने बलात्कार केल्याने पिडितने त्यावेळी मरण यातना भोगल्या. दरम्यान घटनेची दखल घेत पालकमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चौकशीसह आरोपीस तातडीने अटक करण्याचे आदेश दिले आहेत.



सोमवारी पहाटे ५.३० वा. सुमारास २६ वर्षीय तरुणी ही स्वारगेट बस स्थानकामधून फलटणला जाणार होती. तीने दत्तात्रय पान २ वर

### त्याला फाशीची शिक्षा करणार–अजित पवार

सर्व सीसीटीव्हीची बारकाईने पाहणी करायला सांगितली आहे. काहीही करुन तो आरोपी सापडला पाहिजे. त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. ज्या मुलीवर हा प्रसंग उद्भवला आहे, त्या मुलीच्या बाबतीत ज्या काही गोष्टी करायची आहे ते करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मी त्या जिल्ह्याचा पालकमंत्री असल्याने मलाही ती गोष्ट ऐकल्यानंतर अतिशय मनस्ताप झाला, असेही अजित पवार म्हणाले.

# दोषी राजकीय नेत्यांवर आयुष्यभराची बंदी नको

## केंद्र सरकारची सुप्रीम कोर्टात विनंती; गुन्हेगारमुक्त राजकारण कसे होणार?

नवी दिल्ली । वृत्तसेवा

गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या राजकीय नेत्यांवर आयुष्यभरासाठी बंदी घालणे कठोर ठरेल. सध्या अपात्रतेचा असणारा सहा वर्षांचा कालावधी आहे प्रतिबंधक म्हणून पुरेसा आहे, असे केंद्राने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले आहे. गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दोषी ठरलेल्या राजकीय नेत्यांवर आजीवन बंदी घालण्याची आणि खासदार आणि आमदारांवरील गुन्हेगारी खटले जलद निकाली काढण्याची मागणी करणाऱ्या अधिवक्ता अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केलेल्या याचिकेला उत्तर देताना केंद्र सरकारने हे म्हटले आहे. तसेच





अपात्रतेचा कालावधी निश्चित करणे केवळ संसदेच्या अधिकारक्षेत्रात आहे असेही केंद्र सरकारने सांगितले आहे.

आयुष्यभरासाठी बंदी घालणे असेल की नाही हा प्रश्न केवळ संसदेच्या अधिकारक्षेत्रात येतो, असे केंद्राने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. तसेच अपात्रतेचा कालावधी सभागृह प्रमाणता आणि तर्कशुद्धतेच्या तत्त्वांचा विचार करून ठरवते असेही सांगितले.

शिक्षेची मर्यादा योग्य कालावधीपर्यंत मर्यादित करत, प्रतिबंध केला जाईल याची खात्री करण्यात आली असून, अनावश्यक कठोरता टाळली गेली असल्याचे सांगण्यात आले आहे. उपाध्याय यांनी त्यांच्या याचिकेत लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ८ आणि ९ ला आव्हान दिले आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ८ (१) अंतर्गत, अपात्रतेचा कालावधी दोषी ठरवल्याच्या तारखेपासून सहा वर्षे किंवा तुरुंगवासाच्या बाबतीत, सुटकेच्या तारखेपासून सहा वर्षे होता, असे सरकारने प्रतिज्ञापत्रात सांगितले आहे.

कलम ९ अंतर्गत, भ्रष्टाचार किंवा राज्याशी बेईमानी करण्याबद्दल बडतर्फ करण्यात आलेले सरकारी कर्मचारी अशा बडतर्फीच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी अपात्र ठरतात. उपाध्याय यांनी दोन्ही प्रकरणांमध्ये अपात्रता आयुष्यभरासाठी असावी अशी मागणी केली.

प्रतिज्ञापत्रात, केंद्राने मर्यादित शिक्षा करण्यात काहीही असंवैधानिक पान २ वर

### काँग्रेससह भाजपलाच गुन्हेगारीमुक्त राजकारण नकोय

केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र देऊन देशाचे राजकारण हे गुन्हेगारी मुक्त नकोय, असाच एक प्रकारे संदेश दिला असल्याचे यावरुन दिसते. तसेच सर्वोच्च न्यायालयाने एप्रिल २०१३ मध्ये किमान दोन वर्षांच्या शिक्षेसह दोषी ठरलेल्या खासदारांना ताबडतोब सभागृहातून अपात्र ठरवले जावे, त्यांना अपील करण्यासाठी तीन महिन्यांचा वेळ दिला जाऊ नये असा निर्णय दिला होता. केंद्रातील यूपीए सरकारने याविरोधात अध्यादेश काढला होता, ज्याला काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जोरदार विरोध केला होता. राहुल गांधी यांनी हा अध्यादेश फाडून टाकत मूर्खपणा असल्याचे म्हटले होते. यावरुन काँग्रेससह भाजपला सुध्दा देशातील राजकारण हे गुन्हेगारमुक्त करायचे आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

cmyk

## अग्रलेख

# स्कूल बस नियमावली कागदावर नको

शालेय विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी स्कूल बससाठी येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून नवी नियमावली निश्चित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमली आहे. पुढील एका महिन्याच्या कालावधीत ही समिती आपला अहवाल परिवहन खात्याला सादर करणार आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर जी नियमावली तयार होईल, त्याची अंमलबजावणी फक्त कागदावर राहायला नको आहे, अशी भावना मात्र पालकवर्गाची झाली आहे. या आधी राज्य सरकारच्या वतीने २०११ साली स्कूल बस नियमावली जारी केली होती. तरीही पुन्हा नियमावली काढण्याची वेळ का आली आहे. याचा अर्थ 'दया, कुछ तो गडबड है' असे म्हणण्याची वेळ आली आहे.

राज्यातील विविध शाळा आणि खासगी बस ऑपरेटरद्वारे चालवल्या जाणाऱ्या स्कूल बसेसच्या कार्यपद्धतीबाबत पालकांचा जोरदार आक्षेप आहे. विद्यार्थ्यांना शाळेत नेण्यासाठी खासगी संस्थांमार्फत हजारो स्कूल बसेस चालवण्यात येतात. या स्कूलबसच्या माध्यमातून अनेक संस्थांचालक पालकांची आर्थिक लुबाडणूक करत असल्याच्या तक्रारीही मागील काही वर्षांत परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेत, येत्या शैक्षणिक वर्षापासून खासगी स्कूल बसेससाठी नवी नियमावली निश्चित करण्यासाठी समिती नेमण्याचा निर्णय घेतला आहे, तो निश्चितच स्वागतार्ह आहे. तसेच या संदर्भात विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकांची मनमानी रोखण्यासाठी मदान समितीने सन २०११ मध्ये ज्या उपायोजना सुचवल्या होत्या, त्या विचारात घेऊन सर्वंकष अहवालाच्या आधारे स्कूल बसेससाठी नियमावली निश्चित केली जावी, याकडे परिवहन मंत्र्यांनी लक्ष वेधले आहे.

शालेय शुल्क व स्कूल बस शुल्क एकाच वेळी पालकांकडून आकारले जात असल्यामुळे पालकांवर आर्थिक बोजा पडतो. त्यामुळे ही समिती २०११ साली विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची मनमानी रोखण्यासाठी मदान समितीने ज्या उपाययोजना सुचवल्या होत्या, त्याही विचारात घेतल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता प्रत्येक बसमध्ये आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदतीसाठी पॅनिक बटन, आग लागल्यास त्वरित नियंत्रणासाठी आग प्रतिबंधक स्पिंकलर, जीपीएस यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरा असणे आवश्यक असणार आहेत. तसेच ज्या संस्था अथवा स्कूल बस चालवणारे चालक पालकांकडून विद्यार्थी वाहतुकीचे शुल्क आकारतात, त्यांच्याकडे बसेसमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे एकात्मक नियंत्रण ठेवण्याचा विचार केला जात आहे, ही सुद्धा चांगली बाब आहे. जेणेकरून बसमध्ये विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणतीही घटना घडली तरी, त्यावर उपाययोजना करणे त्वरित सोपे जाईल.

अडीच वर्षांपूर्वीची एक घटना डोळ्यांसमोर येते. सांताक्रूज येथील पोद्दार स्कूलची बस विद्यार्थ्यांना घेऊन चार तास मुंबईच्या अन्य रस्त्यांवरून फिरत होती. त्यामुळे ही स्कूल बस नक्की कुठे गेली याचा पत्ता न लागल्याने, पालक चिंताग्रस्त झाले होते. सुदैवाने त्यावेळी कोणतेही दुर्घटना घडली नव्हता. देव पाण्यात ठेवून आपल्या मुलांची प्रतीक्षा करणाऱ्या पालकांचा जीव त्यानंतर भांड्यात पडला. मुले सुखरूप घरी परतली. त्यामुळे, स्कूल बस आणि मुख्याध्यापक, पालक यांचा जीपीएसच्या माध्यमातून संपर्क व्हायला हवा, हा मुद्दा त्यावेळी प्रकर्षात पुढे आला. आता नव्या स्कूल बस नियमावलीत बसचे थेट लोकेशन पाहण्यासाठी जीपीएस यंत्रणेवर अधिक भर देण्याची गरज आहे. तसेच, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन, प्रत्येक बसमध्ये पॅनिक बटन, आग प्रतिबंधक स्प्रिंकलर, सीसीटीव्ही कॅमेरा असणे आवश्यक आहे. तसेच, बस चालवणारे चालक किंवा संस्थाचालक, जे पालकांकडून वाहतुकीचे शुल्क आकारतात, विद्यार्थी आणि बस स्टाफच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी त्यांच्याकडे बसमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. मुलींच्या स्कूल बसमध्ये महिला अटेंडंट सक्तीने असावे, याचा नव्या नियमावलीत समावेश असावा.

पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करावा लागतो. त्यात अप्रत्यक्ष लुटमार होऊ नये याची काळजी सरकारने घ्यायला हवी. एकूण कालावधीपैकी १० महिने या स्कूल बसेस विद्यार्थी वाहतूक करतात; परंतु प्रत्यक्षात पूर्ण वर्षाचे शुल्क एकाच वेळी संबंधितांकडून आकारतात. ते यापुढे थांबायला हवे. तसेच शालेय शुल्क व शाळा बस शुल्क एकाच वेळी पालकांकडून आकारले जात असल्यामुळे त्याचा प्रचंड मोठा आर्थिक बोजा पालकांवर पडतो. जे अत्यंत अन्यायकारक आहे. त्याऐवजी संबंधित स्कूल बसचालकांनी केवळ दहा महिन्यांसाठीचे विद्यार्थी वाहतुकीचे शुल्क एकाच वेळी न घेता दर महिन्याला स्वीकारण्याची तरतूद असावी, असा पालकांचा आग्रह आहे. ज्या शाळा किंवा बस ऑपरेटर पालकांकडून वाहतूक शुल्क आकारतात, त्यांच्यासाठी नव्या नियमावलीनुसार प्रणाली बंधनकारक असणार आहे. या प्रणालीद्वारे बसच्या हालचाली आणि आतील घडामोडींवर सतत देखरेख ठेवली जाईल. स्कूल बस ऑपरेशन्समध्ये अधिक जबाबदारी आणणे. या सुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या स्कूल बसेसवर कठोर कारवाई केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित बस ऑपरेटरचा परवाना रद्द केला जायला हवा. पालकांच्या तक्रारींना योग्य उत्तर देत सुरक्षा उपायांची काटेकोर अंमलबजावणी करण्याला प्राधान्य द्यायला हवे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही शाळा व्यवस्थापन, बस ऑपरेटर आणि शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. या नवीन नियमांमुळे स्कूल बसेसच्या व्यवस्थापनात सुधारणा होईल आणि शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व नियोजनबद्ध होईल, अशी सकारात्मक अपेक्षा करायला हरकत नाही. याची काळजी संबंधित परिवहन विभागाने नक्कीच घ्यायला हवी.



पिंपळवंडी:- श्री.अश्वत्थलिंग पिंपळवंडी येथे महाशिवरात्रीनिमित्त माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी देवदर्शन घेऊन भाविकांना मार्गदर्शन केले. यावेळी मठाधिपती महादेवानंदभारती महाराज,मा.सभापती अरुण डाके, जिल्हा बँक मा.उपाध्यक्ष विलास बडगे,सखाराम मस्के,सरपंचपती निलेश मोरे,अशोक जेधे,महेश खेंगरे व गावकरी.

## चकलांबा येथे पंचाळेश्वर महादेव मंदिरात आज डॉ.गणेश महाराज शास्त्री यांचे काल्याचे कीर्तन


बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील श्री पंचाळेश्वर महादेव मंदिरात प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी भव्य शिवरात्री महोत्सवाचे आयोजन दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ पासुन करण्यात आले आहे.



या महोत्सवाची सांगत गुरुवार दि.२७ रोजी निमित्त ह.भ.प. डॉ.गणेश महाराज शास्त्री दुपारी १२.०० ते २..०० वेळात काल्याचे कीर्तन, होणार आहे.

महाशिवरात्री महोत्सवनिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनास भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पंचाळेश्वर संस्थांचे कार्यकर्ते, भाविक भक्त व चकलांबा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



माजलगाव:-विधानसभेचे माजी आमदार मोहनराव काका सोळंके यांना वाढदिवसाच्या निमित्त त्यांच्या निवासस्थानी जाऊन शुभेच्छा देताना माजलगाव मतदार संघाचे नेते रमेशराव आडसकर या वेळी उपस्थीत.उपसभापती सुनिलराव शिनगारे,दता काका डाके,रंजीत आडसकर व सहकारी.!

# महायुतीत कोल्ड वॉर? : देवेंद्र फडणवीसांनी घेतलेल्या बैठकीत दोन्ही उपमुख्यमंत्री गैरहजर

मुंबई-नाशिकच्या कुंभमेळ्यावरुन महायुतीत कोल्ड वॉर सुरु आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कारण बुधवारी फडणवीसांनी घेतलेल्या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची गैरहजेरी होती. तर काही दिवसांपूर्वी शिंदेंनी घेतलेल्या बैठकीत गिरीश महाजनांनी देखील दांडी मारली होती.

नाशिकमधील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. दरम्यान या बैठकीला दोन्ही



उपमुख्यमंत्र्यांनी गैरहजेरी लावली होती. यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं आहे. दरम्यान काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदेंनी कुंभमेळासंदर्भात नाशकात घेतलेल्या बैठकीला गिरीश महाजन देखील उपस्थित नव्हते.

काही दिवसांपूर्वी गिरीश महाजन यांनी कुंभमेळ्याच्या आयोजनाबाबत एक बैठक घेतली होती. या बैठकीला मंत्री दादा भुसे अनुपस्थित होते. तर १४ फेब्रुवारीला एकनाथ शिंदेंनी घेतलेल्या बैठकीत गिरीश महाजन गैरहजर होते

भाजपच्यी बैठकीची तयारी करायची होती त्यामुळे गैरहजर असल्याचे स्पष्टीकरण गिरीश महाजन यांनी त्यावेळी दिले होते.

### महाकुंभबाबत बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे

* गेल्या कुंभमेळ्यापेक्षा ५ पट भाविक येतील हे गृहीत धरून नियोजन * प्रयागराज महाकुंभला भेट देऊन आलेल्या अधिकाऱ्याकडून व्यवस्थेचे सादरीकरण * नियोजन आणि समन्वयासाठी प्रशासन कुंभ प्राधिकरण स्थापन करणार * कुंभमेळाबाबतचे विधेयक अधिवेशनात मांडलं जाणार * चा अधिकाधिक वापर करावा, तंत्रज्ञान महाकुंभ असं स्वरूप द्यावं * संपूर्ण नियोजनात शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि पोलिसांनी सौजन्य पाळावे

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रशासनाला निर्देश

२०२७ मध्ये नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा असणार आहे. दरम्यान या कुंभमेळ्याला देशभरातील लाखो भाविकांची नाशकात मोठी गर्दी होणार आहे.

# ट्रॅक्टर चोरी करणारा चोर पकडला

अंबड । प्रतिनिधी

२५ फेब्रुवारी रोजी मौजे पैठण फाटा शहागड येथे सर्वीस रोडवर उभा केलेले ट्रॅक्टर क्रमांक -२०--०९८९ हे ईसम जनक यमाजी घमाट रा. गंगाचिंचोली ता. अंबड याने त्याचे स्वतःच्या फायदयासाठी लबाडीच्या ईरादयाने ५,०००००/- रुपये किमतीचे ट्रॅक्टर महिंद्रा कंपनीचे ६०५ अर्जुन अल्ट्रा मॉडेल असलेले ट्रॅक्टर ज्याचा आर.टी.ओ पासींग क्रमांक -२०--०९८९ असे असेलेले जु.वा.किं.अं. असे चोरुन घेवुन जात असतांना मिळून आला त्यावरुन पोस्टे गोंदी गुरनं ६०/२०२५ कलम ३०३(२) प्रमाणे यातील फिर्यादी कदम




मो.क्र.९८२३५२८५११ यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद वर्णानाचे ट्रॅक्टर जप्त करण्यात आले असुन आरोपीस अटक करण्यात आले आहे.

सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बंसल , अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी , उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल खांबे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनी राऊत, पोउपनी हावले, पोहेकॉ/०८ केंद्रे, पोकॉ/१४ सिद्दीकी, यांनी कारवाई केली असुन सदर गुन्ह्याचा पुढील गुन्ह्याचा तपास पोहेकॉ/०८ केंद्रे करत आहेत.

## पान १वरून...

### कापसाने महाराष्ट्राप्रमाणे

अपेक्षेप्रमाणे यंदा वाढलेली नाही. त्यामुळे कापसाचे भाव दबावात आहेत. त्यातच डॉलरच्या तुलनेत इतर देशांच्या चलनाचे अवमूल्यन होत आहे. त्यामुळे अमेरिकेचा कापूस महाग ठरतो आहे. याचा परिणाम अमेरिकेतील दरावर झाला.

२०२४ मध्ये केवळ कापूसच नाही तर जवळपास सर्वच पिकांचे बाजारभाव घसरले आहेत. शेतकऱ्यांना मका आणि सोयाबीनच्या तुलनेत यंदा कापसामधून कमी परतावा मिळाला. त्यामुळे शेतकरी कापूस लागवड कमी करण्याच्या निर्णयावर आल्याचे काऊंसीलचे म्हणणे आहे. २०२५ मध्ये मागणी वाढून जागतिक पातळीवर कापसाचा वापर वाढण्याचा अंदाज आहे. पण चालू हंगामात जागतिक पातळीवर कापसाचे भाव कमी आहेत. त्यामुळे जागतिक कापूस उत्पादनात पुढील हंगामात लागवड कमी राहून उत्पादनही कमीच राहण्याची शक्यता आहे, असा अंदाज काऊंसीलने व्यक्त केला.

-------------

### पंजाबच्या गव्हामुळे

हरियाणाशी असल्याचे समोर आले आहे. गव्हात एक घटक सर्वाधिक असल्याने केस गळती होत असल्याचे समोर आले आहे.

-------------------------

### पुण्यात भल्या पहाटे

गाडे यास फलटणची बस कोठे लागते असे विचारल्यावर त्याने मीच त्या गाडीचा चालक असल्याचे सांगून गोड बोलून बसमध्ये घेऊन गेला. तिथे त्याने तरुणीला आराडाओरड केल्यावर जीवे मारण्याची धमकी देत तिच्यावर बलात्कार केला. पोलिसांकडून या नराधम आरोपी दत्तात्रय गाडे याचा शोध घेतला जात आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज देखील समोर आले आहे. त्यामध्ये ही तरुणी आरोपी सोबत काही वेळ बोलत होती आणि त्याने तिची दिशाभूल करून, तिला खोटे सांगून बसमध्ये नेले आणि अत्याचार केला. ती मुलगी काही वेळ त्याच्याशी बोलताना सीसीटीव्हीत दिसत आहे. यावेळी नेमके काय काय घडले त्याची माहिती देखील समोर आली आहे. या घटनेनंतर पुणे हादरुन केले असून पोलिसांनी आरोपीस अटक करण्यासाठी ८ पथके तैणात केली आहेत. तसेच अजित पवार यांनी सुध्दा दखल घेत चौकशीचे आदेश दिले आहेत. या घटनेनंतर ठाकरे सेनेने स्वारगेट बसस्थानकाची तोडफोड केली असून बसस्थानकातील सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान पिडित मुलीच्या वैद्यकीय तपासणी अहवालात तिच्यावर दोन वेळा बलात्कार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे हा बलात्कार गाडे यानेच दोन वेळा केला की दुसऱ्या कोणी केला असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

एकाच वेळी २३ जण निलंबित

स्वारगेट बसस्थानक परिसरात सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या

## पान १वरून...

२३ सुरक्षा रक्षकांना निलंबित करण्याची कारवाई परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली असून नविन २३ सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केली आहे. तसेच डेपो मॅनेजर आणि वाहतुक नियंत्रक यांच्या चौकशीचे आदेश दिले असून आठवड्यात आहवाल देण्याचे सांगितले आहे. त्यानंतरच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

निलम गोऱ्हे यांच्याकडून बसची पाहणी

शिवसेना नेत्या निलम गोऱ्हे यांनी स्वारगेट बसस्थानक येथे जावून सदरील बसची पाहणी केली. बसचा दरवाजा लॉक होत नसल्याचे निदर्शनास आले. तसेच बसमधील सीसीटिव्ही देखील सुरु नव्हती. आरोपीला अटक करुन कठोर शिक्षा देण्याची मागणी केली.

### दोषी राजकीय नेत्यांवर

नसून, असं करणं कायद्याचे एक निश्चित तत्व आहे असे सांगितले. याचिकाकर्त्याने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे व्यापक परिणाम आहेत आणि ते स्पष्टपणे संसदेच्या कायदेविषयक धोरणात येतात आणि अशा संदर्भात न्यायालयीन पुनरावलोकनाच्या रूपरेषांमध्ये योग्य बदल केले जातील, असे त्यात म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालय केवळ कायदे असंवैधानिक म्हणून रद्द करू शकते, परंतु याचिकाकर्त्याने मागितलेल्या आजीवन बंदीची सवलत देऊ शकत नाही असा युक्तिवाद केंद्राने केला आहे.

### महाशिवरात्रीनिमित्त

गेले होते. यावेळी नदी पात्राचा अंदाज न आल्याने तिघा सख्या बहिणींचा बुडून मृत्यू झाल्याचे म्हटले जात आहे. या कुटुंबातील एक मुलगा आणि महिला दगडाला धरुन राहिल्याने कशाबशा वाचल्याचे म्हटले जात आहे.

बुधवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास चंद्रपूर येथील प्रकाश मंडल आपल्या कुटुंबासह गडचिरोली मार्गावरील व्याहाड येथील वैनगंगा नदीच्या पात्रातअंघोळीसाठी गेले होते.नदीच्या पात्रात उतरल्यानंतर काही वेळातच कविता मंडल, प्रतिमा मंडल आणि लिपिका मंडल या सख्ख्या बहिणी पाण्याचा अंदाज आल्याने खोलात गेल्या. त्यांना पोहता येत नसल्याने त्या बुडायला लागल्या तर एक मुलगा आणि महिलाही प्रवाहात खडकाला धरुन राहिल्याने कसेबसे बचावले. यावेळी त्यांची आरडाओरड सुरू असूनही कोणीच मदतीला नव्हते. यातील कुटुंबातील मुलगा आणि महिला पात्रातील खडक हाताला लागल्याने त्याला पकडून राहिले. मात्र तीन बहिणी बेपत्ता पाण्याच्या प्रवाहात नाहीशा झाल्या. यातील कविता मंडल हिचा मृतदेह मात्र काही वेळाने मिळाला. मात्र दोघी बहिणींचा शोध सरु करण्यात येत आहे. घटनेची माहिती कळताच पोलीसांनी धाव घेतल्याने खडकाला पकडून असलेल्या मुलाला आणि महिलेला वाचवण्यात कसेतरी यश मिळाले. महाशिवरात्री निमित्ताने अनेक भाविक नदीपात्रात अंघोळीसाठी जात असतात. परंतू पोहण्याचा जराही अनुभव नसल्याने हा अपघात

## पान १वरून...

झाल्याचे म्हटले जात आहे.

### महाशिवरात्रीनिमित्त वैद्यनाथ

दर्शन घेतले. दरम्यान महाशिवरात्रीनिमित्त बीड जिल्ह्यातील सर्वच शिवालयात शिवनामाचा गजर झाला होता.

मंदिर परिसरात पोलीस प्रशासनाकडून तगडा बंदोबस्त करण्यात आला होता. सुरक्षेसाठी शेकडोहून अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. वैद्यनाथ देवस्थान कमिटीच्या १२० सीसीटीव्ही कॅमेर्यांची परिसरात करडी नजर होती. महिला भाविकांसाठी वेगळी तर पुरुष भाविकांसाठी वेगळी रांग करण्यात आली होती. पासधारकांची वेगळी रांग असून या पाससाठी १०० रू शुल्क आकारले गेले आहे. वैद्यनाथ देवस्थान कमिटीकडूनही मंदिरात स्वयंसेवक कार्यरत आहेत. तसेच विविध शासकीय निम शासकीय कार्यालया मार्फत आलेल्या भक्तांना फराळाचे वाटप तसेच विविध राजकीय पक्षाच्या वतीने पाणी व फराळाचे वाटप करण्यात आले. फराळाचा लाभ हजारो भाविक भक्तांनी घेतला.

मंदिर परिसरात बाहेर गावाहून आलेल्या भाविकांच्या सामान, तसेच मोबाईल पर्स, चप्पल ठेवण्याची व्यवस्थ करण्यात आली होती. आलेल्या भाविकांची कसलीही गैरसोय होणार नाही. याची दक्षता देवल कमिटी, पोलीस प्रशासह, नगरपालिका, स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकानी घेतली. भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या रांगा लावलेल्या होत्या. वैद्यनाथ भगवान की जय, हर हर महादेव, शंकर भगवान की जयच्या जयघोषानी मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. महाशिवरात्री निमित्त लाखो शिवभक्तंनी प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले. वैद्यनाथ देवल कमेटीचे अध्यक्ष तथा परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख व त्यांच्या सर्व सहकार्यांनी शिवभक्तांना दर्शन सुलभ व्हावे यासाठी प्रयत्न केले. तसेच यावेळी चोख पोलीस बंदोबस्त पोलीस प्रशासनाच्या वतीने तैनात करण्यात आला होता.

**सोमेश्वर संस्थान पालखी...**

दरम्यान परळी शहरापासून जवळच असलेल्या जिरेवाडी येथील सोमेश्वर संस्थानच्या पालखी सोहळ्यात हजारोंच्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते. हातामध्ये टाळ, मुखामध्ये शिवनाम घेत सोमेश्वर संस्थानची पालखी जिरेवाडी येथून वाजत गाजत वैद्यनाथ मंदिरापर्यंत जाते अशी परंपरा आहे.

**मंदिर परिसर गर्दीने फुलाला**

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिरात महाशिवरात्री उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. दरवर्षी प्रमाणे यंदाही देशभरातून लाखोंच्या संख्येने दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या तोबा गर्दीने मंदिर परिसर फुलून गेला होता. जिरेवाडी येथील जागृत दैवत श्री सोमेश्वराच्या पालखीचे यावेळी शिवभक्तांनी मनोभावे दर्शन घेतले.

# तीन महिन्यापासुन फरार आरोपी पोलिसांच्या ताब्यात

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील नुतन वसाहत भागामध्ये भर चौकात रस्त्यावर उभा राहुन हवेत गावठी कट्टयाने फायरिंग करुन जनतेमध्ये दहशत निर्माण करणारा व अवैध शस्त्र बाळगणे, शरीराविरुध्द गुन्हे दाखल असलेला सराईत आरोपी सोनु जाधव, वय-२५ वर्ष, रा. नुतन वसाहत, जालना याचे विरुध्द मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी त्याचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायदयांतर्गत कारवाई केली होती. एम.पी.डी.ए. प्रस्ताव मंजुर झाल्यापासुन तो त्याचे अटक टाळण्यासाठी स्वतःचे अस्तित्व लपवून तो मागील तीन महिन्यापासून फरार होता.

२४ फेब्रुवारी रोजी तो नुतन वसाहत परिसरात आला असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्यास ताब्यात घेवुन एम.पी.डी.ए. मधील पुढील कार्यवाहीस्तव पोलीस ठाणे कदीम जालना येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल , उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ, रामप्रसाद पव्हरे, गोपाल गोशिक, रमेशु राठोड, सागर बाविस्कर, ईरशाद पटेल, सतिष श्रीवास, संदीप चिंचोले, रमेश काळे, संजय सोनवणे सर्व स्था.गु.शा.जालना यांनी केली आहे.

# शिवीगाळ प्रकरणी मटका किंगवर एन सी दाखल

जालना । प्रतिनिधी

बुकी चालकांची मुज्जोरी इतकी वाढली की त्यांना कायद्याचा धाकच उरला नाही . यूट्यूब चैनल चे यांना मारण्या इतपत गेली आहे . याबाबत सविस्तर असे की येथील लोकात्मा न्यूज चॅनेलचे तरंग लक्ष्मणराव कांबळे हे एक आयोजित बैठकिकरिता पोलीस ठाण्यात आले असता बैठकीत उपस्थित असलेल्या अन्य नागरिकांसह येथील मटका चालक हा देखील होता तरंग कांबळे यांना पाहताच तू जास्त माजला का माझ्या नादी लागू नकोस तू काय फारमोठा झाला का तुझ्या सारखे मी खूप पाहिलेत तू मला ठाण्याच्या बाहेर भेट तूला पाहतो तू माझ्या विरोधात बातम्या युट्युब ला लावणार का अशा अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून धमकी दिली याबाबत तरंग कांबळे यांनी पोलीस ठाण्याचे नवनिर्वाचित आयपीएस पोलीस अधिकारी सिद्धार्थ बारवाल यांची भेटून घेत सर्व हकीकत सांगुण ठाण्यात फिर्याद घेऊन एन सी दाखल करण्यात आली.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरूवार दि.२७ फेब्रुवारी २०२५



## न्युमोनिया आजाराने बालिका दगावली



दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयाची विद्यार्थिनी गौरी गिरीश थावरे या बालिकेचे न्युमोनिया आजाराने मंगळवारी दुःखद निधन झाले. गौरीला ४ फेब्रुवारी रोजी सर्दी व ताप आल्यानंतर तिला बीड येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. फुफ्फुसात पाणी झाल्याने तिला पुढील उपचारासाठी संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान फुफ्फुस निकामी झाल्याने उपचारादरम्यान मंगळवारी (दि. २५ रोजी) तिचे दुःखद निधन झाले. तिच्या मूळ गावी आनंदगाव ता. माजलगाव येथे तिच्यावर बुधवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. आनंदगाव येथील माजी सरपंच गिरीश थावरे यांची ती मुलगी होती. इयत्ता सहावीतील सर्वात हुशार असलेल्या विद्यार्थिनींच्या मृत्यूनंतर आनंदगाव सह खोलेश्वर विद्यालयात शोककळा पसरली आहे.

# पिंपळेश्वराच्या दर्शनासाठी लोटला भक्तांचा महासागर

## आ. सुरेश धस यांनी सपत्नीक केला महाभिषेक

आष्टी । प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे याही वर्षी आष्टी शहरातील पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात महाशिवरात्री निमित्त भक्तांचा महासागर लोटला.महाशिवरात्रीच्या प्रारंभी आ.सुरेश धस यांनी सपत्नीक महाभिषेक केला.तर पहाटे ४ ते ७ वाजेपर्यंत सार्वजनिक अभिषेक संपन्न झाले.मात्र

यावर्षी भाविकांच्या प्रचंड गर्दीने आत्तापर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडले असल्याचे यावेळी दिसून आले.

बुधवारी महाशिवरात्री निमित्त आष्टी शहरातील ग्रामदैवत असलेल्या पिंपळेश्वर महादेव मंदिरात पहाटे पासूनच भक्तांची रीघ लागली होती.तत्पूर्वी आ.सुरेश धस यांनी प्रारंभी सपत्नीक महाभिषेक केला.या प्रसंगी निवृत्त जिल्हाधिकारी सुनील चव्हाण हे देखील उपस्थित होते.पहाटे ४ ते ७ यावेळेत भाविक भक्तांनी भक्तांचे अभिषेक संपन्न झाले.सकाळी ७ वाजल्यापासूनच मंदिर परिसरात



मोठ्या प्रमाणावर भक्तांनी गर्दी केली होती.रात्री उशिरापर्यंत या गर्दीने मंदिर परिसर फुलून गेला होता.मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तर सायंकाळी फटाक्याच्या आतषबाजीने सर्वांचे लक्ष वेधले होते.आष्टी तालुक्यासह राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांनी दर्शन घेतले.सायंकाळी पारंपरिक गोंधळ गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.तर भाविकांसाठी उपवासाच्या निमित्ताने महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले होते.आज गुरुवार दि.२७ रोजी दुपारी शहरातून पारंपरिक वाद्यासह पिंपळेश्वर महादेवाच्या प्रतिमेची भव्य शोभा यात्रा संपन्न होणार असून या शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

शिव पार्वती रांगोळीने लक्ष वेधले.

या वेळी मंदिर परिसरात श्रीमती कोमल थेटे यांनी भगवान शिव- पार्वती रांगोळीच्या माध्यमातून साकारलेल्या प्रतिकृतीने सर्वांचे लक्ष वेधले.तब्बल ५ तास ही रांगोळी काढण्यासाठी लागले. ४ ६ आकारात ही रांगोळी साकारण्यात आली होती.

मोफत चहाचे वाटप

शहरातील हॉटेल व्यावसायिक असलेले दत्ता राऊत यांनी सालाबादप्रमाणे यंदाही भाविकांसाठी मोफत चहाचे वाटप केले होते.त्यामुळे आलेल्या प्रत्येक भाविकांनी याचा लाभ घेतल्याने ही अविरत सेवा कायम ठेवण्याचा संकल्प दत्ता राऊत यांनी बोलून दाखवला.

## पान १वरून...

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे


युवकांपर्यंत पोहचवले आणी लातूर, व परभणी जिल्ह्यात युवा सेनेची सक्षम, बळकट बांधणी व नवीन पदाच्या नियुक्ती करण्यात आल्या तसेच नव्या युवक व युवतीचे प्रवेश युवा सेनेत करवून घेण्यात आले. आगामी काळातील होऊ घातलेल्या निवडणुकांच्या अनुषंगाने लातूर आणी परभणी जिल्ह्यात मजबूत संघटन बांधणी या दौऱ्यात विपुल बाळासाहेब पिंगळे आणी सागर विजय बहिर यांनी केले या युवा कार्यकर्त्यांनी लातूर आणी परभणी जिल्ह्यात मा. ना. एकनाथ शिंदे साहेबांच्या शिवसेनेच्या युवा सेनेचा झंजावात निर्माण केला.लातूर व परभणी दौऱ्यावर असताना विपुल बाळासाहेब पिंगळे व सागर विजय बहिर यांनी पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक सुद्धा घेतली, या बैठकीत मार्गदर्शन करतांना सगळ्यात आधी विधान सभा निवडणुकीत मिळवलेल्या यशाबदल सर्वांचे आभार मानले. तसेच आगामी काळातील निवडणुका डोळयांसमोर ठेवून संघटन बांधणी,युवासेना शाखा,कॉलेज युनिट ची स्थापना करणे या बद्धल मोलाच्या मार्गदर्शना सह संगठन बांधणी करण्याचे आदेश सुद्धा विपुल बाळासाहेब पिंगळे आणी सागर बहिर यांच्याकडून देण्यात आले.खरं तर आधी आढावा बैठक म्हणून सुरु झालेल्या आढावा बैठकीला मेळाव्याचे स्वरूपचं आलेले यावेळी बघायला मिळाले.या युवा सेनेच्या झंझावती दौऱ्यात मोठ्या संख्येने युवक आणी युवतींची उपस्थिती बघायला मिळाली. एकंदरीत पाहता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या युवा सेनेने लातूर आणी परभणी जिल्ह्यात युवकांच्या हृदयात आपले स्थान बलकट केलेले दिसून येत आहे. आणी ह्या यशाचे शिल्पकार म्हणून विपुल बाळासाहेब पिंगळे आणी सागर विजय बहिर यांच्या सारखे पदाधिकारी एकनाथ शिंदे साहेबांच्या शिवसेनेचा आणी युवा सेनेचा झंजावात संपूर्ण मराठवाड्यात पसरवतांनां या निमित्ताने दिसून येत आहेत.

### महाराष्ट्र राज्य पत्रकार

तर सचिवपदी बालासाहेब फपाळ व कार्याध्यक्षपदी किसनराव भदरगे यांच्या निवडी सर्वानुमते खेळीमेळीच्या वातावरणात जाहीर करण्यात आल्या. माजलगाव येथील साय दैनिक आपला अभिमानचे माजलगाव तालुका प्रतिनिधी किशन भदर्गे हे गेलाय २०-२२ वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये योगदान देत असल्याने यांची बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड झाल्याने बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे सरचिटणीस कचरू तात्या खळगे,पत्रकार अनिकेत,भिलेगावकर,पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे ,एडवोकेट विजय टमके,प्रदीप कर्डिले,रामकिसन कर्डिले, दुगाने इत्यादींनी किसन भदर्गे यांची बीड जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करून अभिनंदन केले

## योगेश्वरी शिक्षण संस्थेने उभारले मराठवाड्यातील सर्वात मोठे तारांगण

### राष्ट्रीय विज्ञान दिनी शुक्रवारी उद्घाटन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून श्री योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई संचालित पू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राच्या तारांगण प्रकल्पाचे उद्घाटन होत आहे. प्रसिद्ध खगोलतज्ज्ञ श्री. हेमंत मोने आणि भुगोलतज्ञ श्री. एल.के.कुलकर्णी यांच्या उपस्थितीत हा भव्य सोहळा पार पडणार आहे. शंभर वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात अविरतपणे भरीव योगदान देणाऱ्या आणि महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेने ग्रामीण भागात वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे यांच्या प्रेरणेतून साकारलेले मराठवाड्यातील सर्वात मोठे तारांगण ठरणार आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी अनोखी संधी ग्रामीण विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी आणि खगोलशास्त्राचा थेट अनुभव घ्यावा, यासाठी ही आधुनिक सुविधा उभारण्यात आली आहे. मराठवाड्यातील सर्वात मोठे आणि अत्याधुनिक हे तारांगण आठ मीटर व्यासाचे असून, एका वेळी जवळपास चाळीस प्रेक्षकांची आसनव्यवस्था आहे. वातानुकूलित सुविधा, उत्कृष्ट ध्वनी आणि प्रकाशयोजना यामुळे विद्यार्थी आकाशगंगा, ग्रह, तारे, नक्षत्रे, कृत्रिम उपग्रह यांसारख्या खगोलशास्त्रीय गोष्टींचा थरारक अनुभव घेऊ शकतील. या तारांगणात थ्रीडी सिंगल फीश आय लेन्स डिजीटल प्रोजेक्टर वापरण्यात आला असून, पन्नासहून अधिक खगोलशास्त्राशी संबंधित शो मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांमध्ये उपलब्ध असतील. विशेषतः बायोग्राफी ऑफ युनिव्हर्स हा प्रसिद्ध शो विद्यार्थ्यांसाठी आकर्षण ठरणार आहे. हा विज्ञानप्रकल्प २.५ कोटी रुपये खर्चून, कोणत्याही शासकीय मदतीशिवाय केवळ लोकसहभाग आणि माजी विद्यार्थ्यांच्या योगदानातून साकारला आहे. पूर्वी तारांगणाचा अनुभव घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मुंबई,पुणे, हैदराबाद येथे जावे लागत असे, मात्र आता बीड जिल्ह्यातच अत्यंत माफक दरात ही सुविधा उपलब्ध होणार आहे. या उपक्रमातून भविष्यात इसरो आणि नासा मध्ये काम करणारे वैज्ञानिक घडावेत, हा योगेश्वरी शिक्षण संस्थेचा उद्देश आहे. या ऐतिहासिक विज्ञानप्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका शिवसेना ताकतीने लढवणार - बाजीराव चव्हाण

माजलगाव । प्रतिनिधी

आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका शिवसेना उपमुख्यमंत्री शिवसेना नेते ना. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ताकतीने लढवणार असल्याचे मत युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी व्यक्त केले.युवा सेनेच्या विजयी दौऱ्यात आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व खासदार श्रीकांत शिंदे फाउंडेशन संपर्क कार्यालयाच्या उद्घाटन दि.२४ फेब्रुवारी सोमवार रोजी करण्यात आले यावेळी चव्हाण बोलत होते.

या कार्यक्रमास युवासेना मराठवाडा सचिव निलेश शिंदे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप,युवासेना मराठवाडा युवती निरीक्षिका आकांक्षा चौगुले, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव,जिल्हाध्यक्ष युवासेना बीड रविराज बडे, शिवसेना जिल्हा सचिव सुनील अनभुले,

### माजलगावात युवा सेना विजयी दौऱ्याचे उत्साहात स्वागत



जिल्हाध्यक्ष युवासेना बीड सुजित शिंदे, वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर, युवासेना जिल्हा प्रमुख अजय सुरवसे,युवानेते सूरज चुंगडे,सुमित कोळपे,ओम जाधव हे उपस्थिते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मान्यवरांचे माजलगाव मध्ये शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहर प्रमुख धनंजय (पापा) सोळंके,युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, माजी नगरसेवक विजय मौजकर शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईजड, शिवसेना उपतालुकाप्रमुख माऊली कदम, युवासेना उप तालुकाप्रमुख रामेश्वर काशीद, बाळासाहेब मायकर,रोहित मौजकर आदीनी अविस्मरणीय जल्लोषात स्वागत केले.या कार्यक्रमासाठी येत असताना शिवसेनेचे शहर संघटक माजी नगरसेवक विजय मौजकर यांच्या फार्म हाऊसवर मौजकर परिवाराच्या व शिवसेना युवा शिवसैनिकांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले होते.

# संचमान्यतेच्या नवीन धोरणाला विरोध : कास्ट्राईब

माजलगाव । प्रतिनिधी

येथील बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेमध्ये महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने,राज्य शासनाने नुकताच १५ मार्च २०२४ च्या नवीन संचमान्यतेचे धोरण पारित केले आहे त्यावर विचारमंथन करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.यामध्ये एकंदरीतच हे नवीन संचमान्यतेचं धोरण,संबंध शिक्षण व्यवस्था धोक्यात आणणार असल्यामुळे ते राज्य शासनाने तात्काळ परत घेऊन त्यात दुरुस्ती करावी असे ठरविण्यात आले.

या नवीनसंचमान्यतेच्या धोरणात पारित केलेल्या आदेशामुळे राज्यातील अनेक शाळा बंद होऊन हजारो शिक्षक कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. राज्य शासन पावलोपावली नवनवीन शासन निर्गमित करून,शिक्षकांना शिकवण्यापेक्षा त्यात गुंतवून ठेवण्याचे धोरण अवलंबत असल्यामुळे शिक्षणाचा स्तर खालावत चालला आहे. या संचमान्यतेमध्ये वर्ग सहा ते आठ मध्ये जर २० विद्यार्थी संख्या असेल तर शिक्षक दिला जाणार नाही.इमारत नसेल तर शिक्षक दिला जाणार नाही.असे असल्यामुळे अनेक वर्ग शिक्षकाविना राहून अध्यापनावर याचा दूरगामी परिणाम होणार आहे.विद्यार्थी सर्व विषयांमध्ये निपुण होईलच हे सांगता येणार नाही. राज्य शासन शिक्षकांवर अनेक अशैक्षणिक कामांचा बोजा लादत आहे. त्याचबरोबर भरमसाठ ऑनलाइन कामांमुळे तर शिक्षकांचे कंबरडेच मोडल्या जात आहे.ऑनलाइन कामे करावीत की विद्यार्थ्यांना शिकवावं हा प्रश्न त्याच्यापुढे निर्माण झाला आहे.आणि या सर्वातून शिक्षणाची गुणवत्ता कशी ठेवावी? गुणवत्ता साधली गेली नाही तर पुन्हा शिक्षकावर टांगती तलवार आलीच! या एक ना अनेक समस्या असतानाच,नवीन संच मान्यतेचे धोरण म्हणजे शिक्षण क्षेत्रामध्ये कर्मचारी कपात करून जिल्हा परिषदेतील गोरगरीब,शोषित,वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणापासून जाणीवपूर्वक दूर,वंचित करण्याचे धोरण असल्याचे कास्ट्राईबचे स्पष्ट मत आहे.त्यामुळे जर हे नवीन धोरण परत घेऊन यात सुधारणा केली नाही तर महासंघाच्या वतीने आगामी काळात आंदोलने केली जातील असे कास्ट्राईबचे ता.अध्यक्ष राहुल टाकणखार,नागनाथ पडलवार तसेच विविध शिक्षक संघटनेतील अभ्यासक प्रभाकर साळवे,माणिक राठोड,प्रकाश शिंदे,डावरे सर यांनी सांगितले.

# नेत्रदान ही कघाळाची गरज- डॉ.शेळके

### फार्मसी महाविद्यालयात रक्तदान व नेत्रदान जनजागृती शिबिर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बी फार्मसी (औषध निर्मिती ) महाविद्यालय येथे मंगळवार दि २५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत रक्तदान तथा मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून स्वा रा ती वैद्यकीय महाविद्यालयाचे नेत्र विभाग प्रमुख डॉ एकनाथ शेळके , प्राचार्य संतोष तरके राष्ट्रीय सेवा योजना शिबीर प्रमुख प्रा मामुन कुरेशी हे उपस्थित होते. या कार्यक्रमच्या प्रारंभी महात्मा गांधी, संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. नेत्रदान ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन यावेळी डॉ. शेळके यांनी केले.

या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी प्रास्ताविक सादर केले. त्यांनी रक्तदान व नेत्रदान यांचे महत्व पटवून दिले. नेत्रदान सर्वश्रेष्ठ दान आहे याचे कारण हे आहे की, नेत्रदान केल्यामुळे एक दृष्टिहीन




व्यक्तीला पुनः दृष्टी मिळू शकते. हे कार्य केवळ दया किंवा दान म्हणून करू नये तर ते एक समाजिक कर्तव्य आणि मोठे मानवी समजून करावे. मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबीर आयोजित करण्याचे मुख्य उद्दीष्ट लोकांना नेत्रदानाच्या माहिती पटवून त्याबद्दलचे समज गैरसमज दूर करन लोकांना नेत्रदानासाठी जागरूक बनवणे हा असल्याचे प्राचार्य डॉ संतोष तरके यांनी सांगितले.या शिबिरात प्रमुख अतिथी तथा मार्गदर्शक स्वा रा ती चे डॉ. एकनाथ शेळके यांनीं बोलताना सांगितले की जर एखाद्या व्यक्तीने त्याच्या मृत्यूनंतर नेत्रदान केले असेल तर त्याच्या कुटुंबीयांनी किंवा नातेवाईकांनी काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात आणि त्याबाबत योग्य तथा शास्त्रोक्त पद्धतीने पुढील प्रक्रिया पूर्ण कराव्यात. नेत्रदात्या व्यक्तीच्या नेत्रदानाची माहिती मृत्यू नंतर तात्काळ जवळच्या नेत्र बँक किंवा रुग्णालयाला दिली पाहिजे. मृत व्यक्तीच्या नेत्रदानाची प्रक्रिया ही ६ ते १२ तासांच्या आत केली जाणे आवश्यक असते. कारण डोळ्यांचा योग्य उपयोग करण्यासाठी वेळेची मर्यादा असते. आज समाजात नेत्र दानाबाबत अनेक गैरसमज पसरले आहेत. नेत्रदाना बाबतची जागजरूकता ही म्हणावी तेवढी लोकांमध्ये झाली नसून नेत्रदान ही एक सामाजिक चळवळ म्हणून पुढे येण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत असे आवाहन सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ एकनाथ शेळके यांनी या कार्यक्रम प्रसंगी केले.महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत रक्तदान शिबीर देखील आयोजित करण्यात आले होते. हे शिबीरात विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन येथील बहुतांश विद्यार्थ्यांनी , प्राध्यापक तथा कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. हे शिबीर संपन्न करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख एम. ए . कुरेशी यांनी पुढाकार घेतला. तर महाविद्यालयातील संपूर्ण विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले लिखित तृतीयरत्न महानाट्य सादर



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे रयतेचे राजे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव निमित्त रविवार आणि सोमवार असे दोन दिवशीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मागील ३ वर्षांपासून लिंबागणेश येथे डीजे मुक्त तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातुन शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येतो.

रविवारी ( दि.२३ फेब्रुवारी) रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले लिखित ''तृतीय रत्न'' महानाटकाचे आयोजन करण्यात आले होते.

लिंबागणेशचे भुमिपुत्र प्रा. लेनाजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून भालचंद्र विद्यालयातील ८-९ वी च्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी नाटक सादर केले या नाटकास ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दुसऱ्या दिवशी सोमवार दि.२४ रोजी सायंकाळी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. सजवलेल्या रथातून छत्रपती शिवरायांची प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली विशेष आकर्षण म्हणून संगमेश्वर हलगी पथक कुर्ला बीड, तसेच खालसा स्पोर्ट अकॅडमी पाटोदा यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके आणि लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालयातील ढोल पथक आणि लेझीम पथकाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.यासाठी शाळेचे शिक्षक सचिन वाणी यांनी विशेष परिश्रम घेतले.

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आपले योगदान दिले. शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




# कांदा प्रश्न पेटला! निर्यात शुल्क हटवा

## अन्यथा कृषीमंत्र्यांच्या दारासमोरच आंदोलन, राजू शेट्टींचा





सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात आहे. कारण दिवसेंदिवस कांद्याच्या दरात मोठी घसरण होताना दिसत आहे. अशातच कांदा निर्यातीच्या मुद्यावरुन स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. कांद्याच्या निर्यातीवर लावलेलं २० टक्क्याचं निर्यात शुल्क तातडीनं सरकारनं हटवावं अन्यथा थेट कृषिमंत्र्यांच्या दारासमोरच आंदोलनाचा इशारा दिला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी दिला आहे.

राजू शेट्टी यांनी आज नाशिक जिल्ह्यातील स्वाभिमानी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची भेटी घेत चर्चा केली. यावेळी त्यांनी सरकारला इशारा दिला आहे. शेतकऱ्याची भिकाऱ्याची तुलना करण्यापेक्षा कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करा असे शेट्टी म्हणाले. सरकारनं कांदा जास्तीत जास्त निर्यात कसा करता येईल यावर अधिक भर देण्यासाठी प्रोत्साहन पर योजना जाहीर करण्याची मागणी देखील शेट्टी यांनी केली आहे.

कांद्याचे दर हे सातत्याने कमी होत आहेत. ३००० रुपयाने विक्री होणारा कांदा २००० रुपयांवर आला आहे. आणखी दर कमी होण्याची शक्यता आहे. २० टक्क्यांहून अधिक कांद्याचे उत्पादन यावर्षी वाढण्याची शक्यता देखील निर्माण झाली आहे. अशातच कारण नसताना सरकारनं कांदा निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क लावल्याचे राजू शेट्टी म्हणाले. त्यामुळं सरकारनं आत्ताच उपाययोजना केल्या पाहिजेत. शेतकऱ्याला जर न्याय मिळवून द्यायचा असेल तर निर्यात शुल्क हटवावे आणि निर्यातील प्रोत्साहन द्यावे असे राजू शेट्टी म्हणाले. राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांची भिकाऱ्याबरोबर तुलना करण्यापेक्षा कांदा निर्यात कसा होईल आणि निर्यातशुल्क कसे हटवता येईल हे पाहावं असे शेट्टी म्हणाले. केंद्राकडे पाठपुरावा करावा. कांद्याचे दर आणखी पडले तर कृषीमंत्र्यांच्या दारासमोरच आंदोलन करणार असल्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. कांदा दर घसरणीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेकडून व सर्व राज्यातील शेतकऱ्यांकडून गेल्या अनेक दिवसांपासून केंद्र सरकारने कांदा निर्यातीवरील २० टक्के शुल्क पूर्णपणे रद्द करावे, अशी मागणी होत आहे. दिल्लीतील संसदेच्या अधिवेशनात अनेक खासदारांनी तर नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात अनेक आमदारांनी कांद्यावरील निर्यातशुल्क कमी करण्यासाठी मागणी केली होती.




### महत्वाच्या घटना

१९००: ब्रिटन मधे मजूर पक्षाची ची स्थापना
१८४४: डॉमिनिकन रिपब्लिकला (हैतीपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१८७४: आजच्या दिवशी इंग्लंड च्या लॉर्ड क्रिकेट मैदानावर पहिल्यांदा बेसबॉल खेळ खेळला गेला.
१९५१: अमेरिकेच्या राज्यघटनेत २१ वा बदल करण्यात आला ज्यायोगे एका व्यक्तिच्या राष्ट्राध्यक्षपदाचा जास्तीत जास्त कालावधी ८ वर्षे असा करण्यात आला.
१९८७: मराठी राजभाषा दिन
१९९९: पंधरा वर्षे सुरू असलेली लष्करी राजवट संपुष्टात येऊन नायजेरियात अध्यक्षीय निवडणूक
२००१: जमिनीवरून आकाशातील अनेक लक्ष्यांवर मारा करू शकणार्या 'आकाश' या देशी बनावटीच्या क्षेपणास्त्राची चंडीपूर तळावर यशस्वी चाचणी
२००२: मुस्लिम जमावाने अयोध्येहुन परत येणाऱ्या ५९ हिंदू यात्रेकरूंना गुजरातेतील गोध्रा येथे रेल्वेच्या डब्यात जिवंत जाळले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४८५: बंगालमधील वैष्णव संत व पंथ प्रवर्तक चैतन्य महाप्रभुंचा जन्म.
१८०७: एच. डब्ल्यू. लाँगफेलो अमेरिकन नाटककार व कवी (मृत्यू: २४ मार्च १८८२)
१८९४: कार्ल श्मिट – जर्मन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: १३ जून १८२२)
१८९९: इन्सुलिन चे शोधक जीवरसायनशास्त्रज्ञ चार्ल्स हर्बर्ट बेस्ट यांचा जन्म. (मृत्यू: ३१ मार्च १९७८)
१९१२: मराठीतील ज्येष्ठ कवी व नाटककार वि. वा. शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रज' यांचा जन्म, हा दिवस ''मराठी भाषा दिवस''मराठी भाषा दिवस शुभेच्छापत्रे म्हणून साजरा केला जातो.
१९२६: ज्योत्स्ना देवधर – मराठी व हिन्दी लेखिका आणि आकाशवाणी निर्मात्या (मृत्यू: १७ जानेवारी २०१३)
१९३२: एलिझाबेथ टेलर – ब्रिटिश–अमेरिकन अभिनेत्री (मृत्यू: २३ मार्च २०११)
१९४३: कर्नाटक चे मुख्यमंत्री बी.एस.येडियुरप्पा यांचा जन्म.
१९५२: भारतीय चित्रपट निर्माता प्रकाश झा यांचा जन्म.
१९७१: भारतीय उद्योजक निरव मोदी यांचा जन्म.
१९८६: भारतीय हॉकी खेळाडू संदीप सिंग यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७१२: बहादूरशाह जफर (पहिला) – मुघल सम्राट (जन्म: १४ आक्टोबर १६४३)
१८८७: आनंदीबाई गोपाळराव जोशी – भारतातील पहिल्या महिला डॉक्टर (जन्म: ३१ मार्च १८६५)
१८९२: फॅशन कंपनी लुई वूत्तोन चे डिझायनर लुई वूत्तोन यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८२१)
१९३१: काकोरी कट व लाहोर कट यातील नेते क्रांतिकारक चंद्शेखर आझाद यांचा पोलिसांशी झालेल्या चकमकीत मृत्यू (जन्म: २३ जुलै १९०६)
१९३६: इव्हान पेट्रोव्हिच पाव्हलॉव्ह – चयापचय प्रक्रियेविषयी महत्त्वाचे संशोधन करणारे नोबेल पारितोषिक विजेते (१९०४) रशियन शास्त्रज्ञ (जन्म: २६ सप्टेंबर १८४९)
१९५६: भारतीय वकील आणि राजकारणी गणेश वासुदेव मावळणकर यांचे निधन. (जन्म: २७ नोव्हेंबर १८८८)
१९७६: कर्नाटक चे माजी मुख्यमंत्री के. सी. रेड्डी यांचे निधन.
१९८७: अदि मर्झबान अभिनेते, दिग्दर्शक, नाटककार व संपादक.
१९९७: श्यामलाल बाबू राय ऊर्फ 'इंदीवर' – गीतकार (जन्म: १९२४ धामणा, झांशी, उत्तर प्रदेश)
२०१०: भारतीय शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ते नानाजी देशमुख यांचे निधन. (जन्म: ११ ऑक्टोबर १९१६)

# उन्हाळ्यात अशी घ्या कोंबड्यांची काळजी



उन्हाळ्यात कोंबड्यांची अधिक काळजी घ्यावी लागते. शिवाय या हंगामात त्यांच्या आहाराकडे देखील विशेष लक्ष देणे अत्यंत गरजेचे असते. कारण उन्हाळ्यात कोंबड्यांना संसर्गजनीत रोग होण्याचा धोका जास्त असतो. पोल्ट्री व्यवसाय केवळ अंड्यांच्या उत्पादनासाठीच केला जात नाही, तर त्याच्या चिकनलाही बाजारात मोठी मागणी असते. त्यामुळे उन्हाळ्यात योग्य काळजी व आहार न मिळाल्याने अनेक कोंबड्यांचा अकाली मृत्यू होतो. त्यामुळे पोल्ट्री उत्पादकांना मोठे आर्थिक भुर्दंड सहन करावे लागते.

उष्माघातची लक्षणे : कुक्कुटपालन व्यवसायातील तज्ज्ञांच्या मते, उन्हाळ्यात कोंबड्यांना अधिक त्रास सहन करावा लागतो. त्यांची अंडी घालण्याची क्षमता कमी होऊ लागते. एवढेच नाही तर उन्हाळ्यात कोंबड्यांच्या मृत्यूचे प्रमाणही वाढते. तापमान जेव्हा ३९ अंश सेंटीग्रेडपेक्षा जास्त असते तेव्हा कोंबड्यांना खूप त्रास होतो. या तापमानात कोंबड्याना उष्माघात येण्याचा धोका अधिक वाढतो. उष्माघातात कोंबडीची चोच फुगते, अशक्त होतात, चेंगराचेंगरी सुरू होते आणि अर्धांगवायू होऊन त्यांचा मृत्यू होतो.

प्रोटीनयुक्त आहाराची गरज : उन्हाळ्यात कोंबड्यांना प्रोटीनयुक्त आहार आवश्यक उन्हाळ्यात कोंबड्या कमी धान्य खातात. त्याची भूक कमी होते. त्यामुळे या ऋतूमध्ये कोंबड्यांना अन्न देताना विशेष काळजी घ्यावी लागते. उन्हाळ्यात कोंबडीच्या आहारात प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचे प्रमाण जास्त असायला हवे जेणेकरून कमी खाल्ल्यानंतरही कोंबडीला आवश्यक ते सर्व घटक मिळू शकतील आणि कोंबड्या निरोगी राहतील. त्याच वेळी, अंड्याचे शेल पातळ होऊ नये म्हणून आहारात कॅल्शियमचे प्रमाण वाढवण्याचा सल्ला दिला जातो. यासाठी ओस्टो कॅल्शियम लिक्विड पाण्यात देता येऊ शकते.

तज्ज्ञांच्या मते, कोंबड्यांना थंडीच्या काळात धान्य खायला आवडते. त्यामुळे दुपारी कोंबडीना लाईटचा प्रकाश देण्याव्यतिरिक्त, सकाळी थंड वातावरणात जास्त प्रकाश द्या जेणेकरून कोंबड्या अन्नाचा पुरेपूर वापर करू शकतील. साधारणपणे, कोंबड्या ६० अंश ते ८० अंश तापमानाला प्राधान्य देतात कारण या तापमानात कोंबडीचा आहार आणि अंडी उत्पादनाचा दर जास्त असतो. जास्त तापमानामुळे, कोंबडी कमी खातात आणि कमी अंडी घालतात, ज्यामुळे पोल्ट्री फार्मर्सचे नुकसान होते. त्यामुळे कोंबड्यांच्या आहाराच्या वेळेचीही काळजी घेतली पाहिजे.

पाण्याची व्यवस्था : उन्हाळ्यात कोंबड्यांना अधिक पाणी लागतं असते. कोंबडयांना उन्हाळ्यात दुपटीने पाणी लागते. यासाठी पोल्ट्री फार्ममध्ये नेहमी स्वच्छ आणि थंड पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्याचबरोबर प्लास्टिक किंवा झिंकपासून बनवलेले पाण्याचे भांडे ठेवू नका. त्याऐवजी, मातीचे भांडे वापरावे जेणेकरुन त्यात पाणी जास्त काळ थंड राहील. उन्हाळ्यात, कोंबडी फार्मच्या खालील पृष्ठभागाची जाडी २ इंचांपेक्षा जास्त नसावी. जर लिटर जुने झाले असेल तर ते काढून टाका आणि नवीन लिटर वापरा. असे केल्याने कोंबड्यांमध्ये संसर्ग पसरण्याची शक्यता कमी होईल.

उष्माघातातील काळजी : पोल्ट्री फार्मचे छत पांढऱ्या रंगाने रंगवावे, जेणेकरून सूर्याची किरणे छतावर पडून परत जातील. एस्बेस्टोस शीट्स छतावर देखील स्थापित केल्या जाऊ शकतात, यामुळे छताला जास्त गरम होण्यापासून रोखता येते. खिडक्यांपासून ३-५ फूट अंतरावर गोणपाटाचे पडदे लावून त्यावर पाणी शिंपडून कोंबड्यांचे फार्म थंड करता येते. फॉगर्सची सुविधा उपलब्ध असल्यास पोल्ट्री हाऊसचे तापमानही कमी होऊ शकते. याशिवाय पंखे आणि कुलरचा वापर करून पोल्ट्री हाउसचे तापमानही नियंत्रणात ठेवता येते. अशा पद्धतीने काळजी घेवून काही उपाययोजना केल्यास उन्हाळ्यात कोंबड्यांना होणारा त्रास कमी होऊन मरतुकेचे प्रमाण कमी करता येते. परिणामी कोंबडी पालन आर्थिक पातळीवर यशस्वी होते.

# गांडूळ खत निर्मितीची आधुनिक पद्धती

भारतात किंवा जगभरात आज पुन्हा सेंद्रिय शेतीला इतके महत्व दिले जात आहे की, शेतकरी वर्ग आता रासायनिक खत किंवा रासायनिक फवारणी पेक्षा आपल्या शेतीत सेंद्रिय खत आणि सेंद्रिय फवारणी करण्यास आनंदाने तयार झाला आहे. खरे पाहता सेंद्रिय खत म्हणजे, आपले गांडुळ खत आणि गांडुळ अर्क हेच आपले प्रमुख खत मानले जात होते.

रासायनिक खतांच्या नियमित वापराने भारतीय शेतकऱ्यांच्या कित्येक शेकडो ते हजारो हेक्टर जमिनी नापीक झालेल्या दिसत आहेत. मात्र हळूहळू शेतकऱ्यांना आपली चूक देखील लक्षात येत आहे. म्हणून आता पुन्हा 'सेंद्रिय शेती हीच खरी शेती' असा विचार आणि असा मानस करून आपला बळीराजा आता शेतीसाठी फक्त सेंद्रीय खत वापरु लागला आहे. सेंद्रिय शेतीकडे वळणाऱ्याची संख्याही वरचेवर वाढताना दिसत आहे. विशेषकरून युवा शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीकडे वळण्याचा कल अधिक आहे. ही पर्यावरणाच्या आणि भविष्याच्या दृष्टीने अतिशय आनंदाची बाब म्हणता येईल.

आधुनिक आणि सुधारित गांडुळ खत निर्मिती पद्धत : जुन्या गांडुळ खत निर्मितीत शेण आणि पाला पाचोळा किंवा वाया जात असलेले पदार्थ आणि भाजीपाला तसेच कुजलेले पदार्थ याचा वापर होत असे. या पद्धतीने निर्माण केलेले गांडुळ खत सर्वांना परिचयाचे आहे; परंतु गांडुळ खत निर्मितीच्या पद्धतीमध्ये फारमोठ्या सुधारणा आणि बदल वेळोवेळी होत गेल्या आणि हे केल्या गेलेल्या निरीक्षण आणि परिक्षणावरून सिद्ध देखील झाले आहेत. शिवाय गांडुळ खत निर्मितीसाठी वापरल्या जाणार्या घटकांमध्ये बदल केल्यामुळे त्यापासून मिळणार्या गांडुळ खतामध्ये विविध अन्नद्रव्यांच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ होते, हे संशोधनांत सिद्ध झाले आहे. आधुनिक गांडूळ खत निर्मिती पद्धतीमध्ये आता साखर कारखान्यातील उसाची प्रेस मढ, शेण आणि उत्कृष्ट जातीचे गांडुळ म्हणजे



औस्ट्रेलियन जातीचे गांडुळ वापरून हे गांडुळ खत बनवण्यात येते.

या नवीन आधुनिक पद्धतीत साखर कारखान्यातील उसाची प्रेस मढ वापरल्याने गांडूळाला पौष्टिक आहार मिळतो; जो आहार त्याला सुकलेल्या पाला पाचोळा किंवा कचऱ्यातून मिळत नाही. या नवीन आधुनिक पद्धतीने तयार केलेल्या गांडुळ खतात आपल्या शेत जमिनीसाठी आणि आपल्या कोणत्याही प्रकारच्या पिकांच्या वाढीसाठी उपयुक्त असलेले अन्नद्रव्ये घटक म्हणजे नत्र, स्फुरद, पालाश, कॅल्शियम, मॅग्नेशियम, गंधक, लोह, मंगेनिज, जस्त, तांबे यांचे प्रमाण देखील या आधुनिक गांडूळखत पद्धती मध्ये जास्त असते. या पद्धतीमधुन तयार झालेले 'गांडुळ खत' आणि 'गांडुळ अर्क' हे आपल्या शेतीसाठी एक वरदानच ठरणारे आहे.

प्रशिक्षण आणि माहिती : या आधुनिक पद्धतीचे गांडूळखत निर्मितीचे प्रशिक्षण आणि माहिती मांजरी (पुणे) येथील प्रसिद्ध इन्स्टिट्यूट येथे रीतसर दिले जाते. यापद्धतीचा गांडुळ खत निर्माण करणारा वार्षिक १००० टन गांडूळ खत निर्मिती क्षमता असलेला अनोखा आणि परिपूर्ण प्रकल्प 'वनपुरी' उदाची वाडी (सासवड) येथे 'समृद्धी गांडूळ खत प्रकल्प आणि उद्योग' या नावाने सुरू देखील झाला आहे.

# नाचणी/नागली लागवडीचे तंत्र

नाचणीचे अपेक्षित उत्पादन मिळविण्यासाठी सुधारित जातींची लागवड करावी. पाभरीने पेरणी केल्यास हेक्टरी दहा किलो, तर पुनर्लागवड पद्धतीने पाच किलो बियाणे लागते. रासायनिक खतांची बचत करण्यासाठी युरिया, डीएपी ब्रिकेटचा वापर करावा. नाचणी लागवडीसाठी हलक्या ते मध्यम प्रतीची, चांगले सेंद्रिय पदार्थ असणारी, ५.५ ते ८.५ सामू असणारी जमीन योग्य असते. जमिनीची नांगरट करून पुरेसे शेणखत मिसळावे. हिरवळीचे खत जमिनीत गाडले असल्यास शेणखत किंवा कंपोस्ट खत देण्याची गरज नाही. जमिनीतील पूर्वीच्या पिकाची धसकटे, पालापाचोळा गोळा करून जाळून टाकावा, त्यामुळे खोडकिडीचा प्रादुर्भाव होत नाही.

लागवड तंत्र : ३० बाय १० सें.मी. अंतरावर पाभरीने पेरणी केल्यास हेक्टरी दहा किलो बियाणे लागते. पुनर्लागवड पद्धतीने बियाणे पेरणी केल्यास पाच किलो प्रतिहेक्टरी बियाणे लागते. जास्त पर्जन्यमान असलेल्या भागात बियाणे गादी वाफ्यावर पेरून शेतात त्याची पुनर्लागवड करावी.

बीजप्रक्रिया : तीन ग्रॅम थायरम प्रतिकिलो बियाणे. पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाण्यास २५ ग्रॅम अॅझोस्पिरिलम ब्रासीलेन्स आणि २५ ग्रॅम अॅस्परजीलस ओवोमोरी या जिवाणूसंवर्धकांची प्रक्रिया करावी. गादीवाफे तयार करण्यासाठी रोपवाटिका तयार करावी. ५ १ मी. आकाराचे गादी वाफे तयार करून बियाणे पेरण्याच्या रेषेत क्लोरपायरिफॉस (१.५ डब्लूपी) १२ ग्रॅम भुकटी (उपलब्ध



असल्यास) बारीक वाळूत मिसळून पेरावी. म्हणजे पेरलेल्या बियाण्यास किडी, मुंग्यांचा प्रादुर्भाव होणार नाही. हळव्या जातीची रोपे २१ दिवसांची झाल्यानंतर २२.५ सें.मी. बाय १० सें.मी. अंतरावर पुनर्लागवड करावी. गरव्या व निमगरव्या जातीची लागवडीसाठी रोपे २५ ते ३० दिवसांची वापरावीत.

रोपवाटिका : एक हेक्टर क्षेत्र लागवडीसाठी पाच गुंठे रोपवाटिका पुरेशी होते. पाच गुंठे क्षेत्र रोपवाटिकेसाठी पाच क्विंटल शेणखत गादी वाफ्यावर मिसळावे. बियाणे गादी वाफ्यावर पेरणी केल्यानंतर १० ते १२ दिवसांनी प्रतिगुंठा ५०० ग्रॅम युरिया द्यावा.

पुनर्लागवड : पुनर्लागवडीपूर्वी प्रतिहेक्टरी पाच टन शेणखत जमिनीत मिसळावे. हेक्टरी २५ किलो नत्र, ४० किलो स्फुरद, २५ किलो पालाश पुनर्लागवडीच्या वेळी द्यावे. राहिलेले २५ किलो नत्र प्रतिहेक्टर पुनर्लागवडीनंतर एक महिन्याने द्यावे.

आंतरमशागत : लागवडीनंतर साधारणपणे दोन वेळा खुरपणी करावी. पेरणी दाट झाली असल्यास पहिल्या २० ते २५ दिवसांपर्यंत विरळणी करून एका जागी एकच जोमदार रोप ठेवावे. कारण दाट पेरणी झाल्यास फुटवा कमी होऊन उत्पादन घटते. युरिया, डीएपी ब्रिकेटचा वापर करावा.

रोगविरहित बियाणे : फुले नाचणी, सी.ओ.आर.ए. (१४), आर.ए.- २, जी.पी.यू.- २८, जी.पी.यू,- ४५, जी.पी.यू.- ४८ व एल- ५ यांसारख्या रोगप्रतिकारक जातींची लागवड करावी.

जैविक रोगनियंत्रण : सुडोमोनस फ्लुरोसन्स या जैविक बुरशीनाशकाची ६ ग्रॅम प्रतिकिलो बियाणे प्रक्रिया. सुडोमोनस फ्लुरोसन्स या जैविक बुरशीनाशकाच्या २ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणात तीन फवारण्या. पहिली फवारणी रोगाची लक्षणे दिसून

आल्यानंतर लगेच करावी. दुसरी व तिसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी.

रासायनिक रोगनियंत्रण : कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रतिकिलो बियाण्यास प्रक्रिया.

रोपवाटिकेत पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी. पुनर्लागवडीनंतर २० ते २५ आणि ४० ते ४५ दिवसांनी वरील फवारणी पुन्हा करावी.

# नेत्रदानासाठी जनजागृती आवश्यक आहे-प्रा.शेळके

आंबाजोगाई । प्रतिनिधी

नेत्रदान ही काळाची गरज असून भारतात नेत्रदान करणाऱ्या व्यक्तीचे प्रमाण अत्यल्प आहे. यात मारवाडी, गुजराती व जैन समाजात नेत्र दान करणाऱ्या व्यक्तीचे प्रमाण अधिक आहे. या साठी जनजागृती आवश्यक असून १ व्यक्तीने नेत्र दान केले तर तो २ व्यक्तीला जग दाखवू शकतो असे उदगार स्वा रा ती रुग्णालयाच्या नेत्र रोग विभागाचे प्रा डॉ एकनाथ शेळके यांनी काढले.




येथील खोलेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व गृह विज्ञान विभागाच्या वतीने १० फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ‘‘चॉकलेट मेकिंग व पॅकेजिंग सर्टिफिकेट कोर्स‘‘ च्या समारोप प्रसंगी डॉ एकनाथ शेळके हे बोलत होते. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ प्रीती पोहेकर, उप प्राचार्य डॉ दीपक फुलारी, कार्यक्रम अधिकारी डॉ मानीत कुमार वाकळे, डॉ नागेश यमगीर, डॉ प्रतीक मसारे यांची उपस्थिती होती.नेत्रदान एक वरदान‘‘ या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ एकनाथ शेळके पुढे म्हणाले की, आपण प्रत्येक जन ‘‘पाप पुण्य दान धर्म‘‘ या गोष्टी लहान पना पासुन ऐकत आलो असून कोणत्याही प्रकारच्या दानाची व्याख्या व्यापक आहे. माणसाच्या व्याधी दूर करण्यासाठी ज्या प्रमाणे अवयवदान, देहदान त्याच प्रमाणे नेत्र दान ही असते.ज्या च्या व्यक्तीच आयुष्य अंधकार मय झालेलं असेल त्यांच्या साठी वरदान म्हणजे नेत्र दान होय. आपण नेत्रदान पंधरवाडा साजरा करतो मात्र त्या साठी जनजागृती कमी पडते.नेत्र हवे असणाऱ्यांची संख्या जास्त आहे मात्र नेत्र देणाऱ्यांची संख्या कमी आहे व याला अंधश्रधा हे एक प्रमुख कारण आहे. उलट आपण मेल्यावर आपले डोळे दुसऱ्याला कामी येतात हा वैद्यानिक दृष्टिकोन समोर ठेवला तर तो पुनर्जन्म म्हणावा लागेल. मृत्यू नंतर डोळे दान करणे हा संकल्प म्हणजे नेत्रदान असून वय वर्ष १ ते १०० पर्यंत एवढेच नाही तर ज्यांचे ऑपरेशन झाले आहे त्या व्यक्ती सुद्धा मरणोत्तर नेत्रदान करू शकतात. फक्त रेबीज, एच आय व्ही, काविळ, कॅन्सर ग्रस्त रुग्ण नेत्रदान करू शकत नाहीत. त्या साठी नेत्र पेढी मध्ये फॉर्म भरून द्यावा लागतो. मृत्यू नंतर नातेवाईकही नेत्र पेढीला कळवून मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नेत्रदान करू शकतात.मृत्यू नंतर मयत व्यक्तीच्या डोक्या खाली उशी ठेवावी, त्याचे डोळे बंद करावे, वरती थंड गार कपडा किंवा कापसाचा बोळा ठेवावा. मृत्यू नंतर मृत्यू प्रमाणपत्र काढून ४ ते ६ तासाच्या आत ते नेत्र काढून ती नेत्र पेढीत आणली जातात व त्याची प्रतवारी ठरवून त्याचा वापर केला जातो.चांगल्या प्रतवारीचे नेत्र इतर नेत्र हीन व्यक्ती साठी वापरली जातात व कमी प्रतवारीचे नेत्र हे संशोधन करण्या साठी वापरली जातात.भारतात नेत्रदान करणाऱ्या व्यक्तीचे प्रमाण अत्यल्प असून १ कोटी लोकांचा मृत्यू झाल्यास फक्त ४९ हजार लोक नेत्रदान करतात यात मारवाडी, गुजराती व जैन समाजात नेत्र दान करणाऱ्या व्यक्तीचे प्रमाण अधिक आहे. श्रीलंका या छोट्याशा देशात नेत्र दानाचे प्रमाण मोठे असून हा देश ६० देशांना नेत्र पुरवतो ही कौतुकाची बाब आहे.

वास्तविक १ व्यक्तीने नेत्र दान केले तर तो २ जणांना जग दाखवू शकतो. गोर गरीब वंचित यांना नेत्र दानाचा फायदा अधिक होऊ शकतो त्या साठी अलीकडे नेत्रदानाचे प्रमाण वाढले असले तरी त्या साठी जनजागृती करणे गरजेचे आहे. सरते शेवटी डॉ शेळके यांनी ‘‘जिंदगी का क्या भरोसा मौत कभी बी आजाए, हम तो एसी जिंदगी जीना चाहते है जो औरो को काम आ जाए‘‘ या शेअर ने आपल्या मनोगताची सांगता केली.या वेळी बोलताना डॉ प्रीती पोहेकर मॅडम म्हणाल्या की, आपण पाश्चाती करण करताना भारती करण करण्याचा प्रयत्न करायला हवा तरच चांगले भवितव्य घडू शकते. नेत्र रुग्णा साठी आम्ही १२ वर्षा पूर्वी नेत्र कुंभ सुरू केलं आसुन याची मी सदस्य आहे. आता पर्यंत सव्वादोन लाख नोंदण्या झाल्या त्यात १ लाख ७५ हजार तपासण्या झाल्या असून १८ हजार नेत्र रुग्णावर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत या साठी दीडशे डॉक्टर सेवा देत आहेत. या नेत्र कुंभात असंख्य साधू संतानी नेत्र तपासणी करून घेतली घेत दृष्टी बाधित रुग्णांना दृष्टी देण्याची काम केले आहे. दृष्टी बाधित व्यक्तींची समस्या अनेक आहेत. माणसाला माणूस म्हणून जगता येत नाही. पावला पावलावर समस्या असते. आपण प्रत्येक जन एक नेत्र रोग्यांचा मित्र होऊन त्यांच्या अंधकारमय जीवनात दृष्टी देण्याचे काम करून त्यांना प्रकाशाचीं किरने दाखवू शकतो या प्रसंगी ‘‘चॉकलेट मेकिंग व पॅकेजिंग सर्टिफिकेट कोर्स‘‘ मध्ये प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनींनी आपले अनुभव कथन करत आपल्याला नवीन उद्योग उभारणीस प्रेरणा मिळाली असे उदगार काढले व सर्वांना कोर्स मध्ये बनवण्यात आलेले चॉकलेट वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्र संचलन गृह विज्ञान विभागाच्या प्रमुख डॉ रोहिणी अंकुश तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ बाबा कागदे यांनी मानले.

## थोडक्यात



### विजया एकादशी व गायत्री महायज्ञ संपन्न

बीड । प्रतिनिधी

श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर बीड येथे काल दिनांक २४/२/२५ रोजी विजय एकादशी व गायत्री याग संपन्न झाला. या गायत्री यज्ञाचे यजमान मंदिराचे अध्यक्ष ॲड मंगेश पोकळे व सौ पोकळे ह्या होत्या .

या यज्ञाचे पुरोहित हभप बीड जिल्हा गायत्री परिवाराचे समन्वयक मोहन महाराज खरमाटे यांनी केले. या विजया एकादशी निमित्त यज्ञाला यशवंत नगर परिसरातील असंख्य भावीक भक्त उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम मुकुंद भूतपल्ले, विलास लिंबे यांनी घेतले.या गायत्री यज्ञ समारंभाला हनुमान दास बियाणी, डॉ.ह भ प केशवदास वैष्णव ,चाटे साहेब, तुकाराम पंत जोशी काका, जाधव साहेब ,महावीर शेठ बोरा विणेकरी वाल्मीक चाटे महाराज पोकळे काकू तसेच साईनाथ दुधाळ, जाजू, आदीसह भावीकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते

### बाळूमामा पालखीच्या कार्यक्रमाची उद्या सांगता

चौसाळा । प्रतिनिधी



चौसाळा येथील गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या सद्गुरू बाळू मामा देवालय ट्रस्ट आदमापुर यांच्या पालखी सोहळा निमित्याने विविध कार्यक्रम विशेषतहा दररोज चें अन्नदानाचा कार्यक्रम होत आहे. या पालखी सोहळाची सांगता दिनांक २८/०२ /२०२५ रोजी ११ ते ०५ दरम्यान होणार असून सांगता निमित्ताने चौसाला ग्रामस्ता च्या वतीने सदर बाळू मामा यांच्या पालखी ची गावातून भव्य नगर प्रदीक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक २७/०२/२०२५ रोजी पालखी ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने कन्याआंबील या महाप्रसादाचा कार्यक्रमा आयोजित करण्यात आला आहे .उद्या प्रदक्षिणानंतर सदर पालखीचा मुक्काम पारगाव जी धाराशिव येथे होणार आहे तरी भविक नागरिकांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन सद्गुरू बाळू मामा देवालय ट्रस्ट प्रमुख कारभारी अप्पा माळी पालखी (बग्गा)क्रं ०९ यांनी केले आहे.

# मानव एकच जात, मानवता एकच धर्म-डॉ. सारिका क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

शहरातील ज्ञानसागर गुरुकुल येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व पालक मेळाव्याचे उद्घाटन करताना कल्पतरू प्रतिष्ठानच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी वर्तमान ,सामाजिक व राजकीय परिस्थितीचे वाभाडे काढताना मानव एक जात तर मानवता एकच धर्म असल्याचे अधोरेखित केले .आपल्या मुलांना बालमनावर संस्कार करणे गरजेचे असून मुलांना ऐतिहासिक व आध्यात्मिक कथा सांगून बालवयातच त्यांना सक्षम , सुसंस्कृत करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.




याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक प्राचार्य डी .जी. तांदळे यांनी मोबाईलचा वापर मुलांना घडवण्यासाठी व्हावा त्यामुळे ते बिघडणार नाहीत अशी काळजी घेण्याचा सल्ला देत ते पुढे म्हणाले की ,आपल्या पाल्यांना क्षमतेप्रमाणे आवडीच्या क्षेत्रात करिअर घडविण्यास मदत करावी असे आवर्जून सांगितले. पाली येथील इन्फंट इंडिया आनंदग्रामचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ बारगजे यांनी मुलांना प्रेरणादायी मोलाचे मार्गदर्शन करून आशीर्वाद दिले. वडझरीचे सरपंच संजय सानप, ज्येष्ठ मार्गदर्शक मा. मुख्याध्यापक दिनकर सानप, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे , जनता विद्यालय काकडहिराचे मुख्याध्यापक दिलीप कंठाळे, इंदिरा प्राथमिक विद्यालय उद्यालयाचे मुख्याध्यापक कदम सर, सरस्वती विद्यामंदिर गोरे सर, ह भ प वाघमोडे महाराज, अविनाश सोनवणे , आंतरराष्ट्रीय योग खेळाडू राधाताई तांबे, जीनियस इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका पल्लवी देशपांडे, सौ. मयुरीताई बांगर, सुख सावली दिव्यांग व वृद्धाश्रमचे संचालक माऊली शिरसाट, यांनी प्रसंगोचित मनोगत व्यक्त केले. पाटोदा येथील पालक गोरक्षक संतोष गर्जे तालुका पाटोदा येथे रोटी बँक द्वारे अनाथ निराधारांना नित्यदिनी अन्नदान करत असल्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन दत्ता बारगजे यांनी सत्कार केला .तसेच विविध कला गुणा मधील गुणी मुला-मुलींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. गुरुकुलच्या सर्व शिक्षक शिक्षिका व इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन पालक मेळावा व स्नेहसंमेलन यशस्वी केला .कार्यक्रमास पालक मुकादम आश्रुबा राजपुरे, बाळू गोरे ,विष्णू नागरगोजे ,भाऊसाहेब दराडे, भीमराव नागरगोजे ,कोरडे रामकिसन, ईश्वर सानप, दादासाहेब शेंबडे आदी पालकासह विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश सानप , सूत्रसंचालन सौ. स्वाती सानप तर आभार डॉ. संजय तांदळे यांनी मानले.

# शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी मुदतीत करून घ्यावी -तहसीलदार महिंद्रकर

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ई-पीक पाहणीचे प्रलंबित कामकाज आपल्या गावचे ग्राम महसूल अधिकारी यांचे सहायक मार्फत करण्यात येत असून शेवटची तारीख दिनांक २८.०२.२०२५ आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी ज्यांची पीक पाहणी झाली नाही अशांनी ती सहाय्यक व्दारे लवकरात लवकर करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे.वडवणी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील ई-पीक पाहणीचे प्रलंबित कामकाज आपल्या गावचे ग्राम महसूल अधिकारी यांचे सहायक मार्फत करण्यात येत असून शेवटची तारीख दिनांक २८.०२.२०२५ आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी ज्यांची पीक पाहणी झाली नाही अशांनी ती सहाय्यक व्दारे लवकरात लवकर करून घ्यावी

तसेच ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक नोंदणी, नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र येथे सुरू आहे. प्रत्येक शेतकऱ्यास ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी (शेतकरी ओळख क्रमांक) काढणे अनिवार्य आहे. यापुढील काळात शेतकऱ्यांना पी.एम. किसान योजना, पीक विमा, नैसर्गीक आपत्ती अनुदान, पिक कर्ज व इतर शासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास शेतकऱ्यांना कुठल्याही शासकीस योजनांचा लाभमिळणार नाही याची नोंद घ्यावी. शेतकरी ओळख क्रमांक काढण्यासाठी आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक तसेच शेतीचा गट क्रमांक माहीत असणे आवश्यक आहे. तरी सर्व शेतकरी बंधू भगिनींनी लवकरात लवकर आपल्या नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्र, महा ई सेवा केंद्र येथे संपर्क करून आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे.

# काळाची पावले ओळखून शेतकऱ्यांनी पिके घेतली पाहिजे -आबासाहेब मोरे



माजलगाव । प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या वतीने परभणी येथे आयोजित करण्यात आलेल्या मराठवाडा स्तरिय कृषी महोत्सव नियोजन बैठकीत श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात कृषीरत्न आबासाहेब मोरे यांच्या उपस्थित सेवेकरी, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, काळाची पावले शेतकऱ्यांनी ओळखली पाहिजे व बाजारपेठेत मागणी असलेल्या विषमुक्त पिकांची शेती केली पाहिजे, आज कॅन्सर सारख्या रोगांचा वाढता प्रादुर्भाव दिसतो त्याला कारण आहे रासायनिक खतांचा बेसुमार वापर . उत्पादन वाढीच्या हव्यासापोटी जमीनीची उत्पादन क्षमता खालावत चालली आहे. पर्यावरण,प्लॅस्टिक मुक्ती,नैसर्गिक वायू संरक्षण, बालसंस्कार, कृषीशास्त्र, स्वयंरोजगार अशा विविध विषयांवर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

प्रतिवर्षी जागतिक कृषी महोत्सव नाशिक येथे आयोजित केला जातो त्याच धर्तीवर आगामी दि. ७ मार्च ते १० मार्च दरम्यान मराठवाडा स्तरिय कृषी महोत्सव परभणी शहरात संपन्न होणार आहे.या मेळाव्याच्या नियोजनासाठी माजलगाव येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात बैठक आयोजित करण्यात आली होती.या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन करून झाले.यावेळी माजलगाव,धारुर, वडवणी तालुक्यातील व बीड शहरातील सर्व साप्ताहिक, दैनिक केंद्रातील सेवेकरी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसंग्रामच्या वतीने आयोजित छावा चित्रपटाला प्रचंड गर्दी

## विद्यार्थी, महिला, तरुण आणि शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी

बीड । प्रतिनिधी



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिवसंग्राम च्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांची यशोगाथा आणि जीवनपट जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्या करिता दिव्यांग विद्यार्थी ,महिला, ऊसतोड मजुरांची मुले, निराधार महिला आणि शिवसंग्राम पदाधिकाऱ्यांसाठी ‘‘छावा‘‘ चित्रपटच्या मोफत शोचे आयोजन शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या वतीने दि. २५ रोजी दुपारी बीड येथील तनिष्क सिनेमा येथे करण्यात आले होते. हा चित्रपट मोफत पाहण्यासाठी प्रचंड गर्दी करण्यात आली होती. या प्रसंगी प्रभाकर कोलंगडे, नारायणराव काशीद, सुभाष जाधव, अनिल घुमरे, सुहास पाटील, पंडित माने, बाळासाहेब हावळे, गोपीनाथ घुमरे ,सचिन काळकुटे आदी. उपस्थित होते.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित छावा चित्रपट जास्तीत जास्त लोकांनी पहावा आणि संभाजी महाराजांचा जीवनपट सर्वांना अनुभवता यावा या करिता या शोची आयोजन काण्यात आले होते. जास्तीत जास्त संख्येने महिला आणि विद्यार्थ्यांना हा चित्रपट पाहण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. दिव्यांग विद्यार्थी आणि ऊसतोड मुलांच्या पाल्यांना हा चित्रपट पाण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने हे विद्यार्थी समाधान व्यक्त करत होते. चित्रपट पाहतेवेळी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयघोषाने सिनेमागृह दणाणून गेले होते. हा शो आयोजित केल्या बद्दल तीनही शोसाठी उपस्थित असलेल्या प्रेक्षक महिला, विद्यार्थी यांनी डॉ. ज्योती मेटे यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले. चित्रपट पाहण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिल्याबद्दल चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी डॉ.ज्योती मेटे यांचे आभार मानले त्याचबरोबर ऊसतोड मजुरांच्या मुलांनी आणि महिलांनी देखील डॉ.ज्योती मेटे यांचा सत्कार करत आभार मानले.

# जायकवाडीच्या पाण्यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांचे सिरसमार्ग येथे उपोषण

## शासनास निवेदन: अर्थसंकल्पात योजना मंजूर करण्याची मागणी

बीड, प्रतिनिधी

जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे यासह इतर मागण्यांसाठी सिंदफणाकाठच्या १४० गावातील शेतकऱ्यांनी लोकलढा आंदोलन उभारले आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्या मंजूर करून योजनांसाठी अर्थसंकल्पात निधी मंजूर करावा यासाठी येत्या ३ मार्च पासून १४० गावातील शेतकरी सिरसमार्ग येथे उपोषणास बसणार आहेत. शेतकऱ्यांनी सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या संदर्भातील मागणीचे निवेदन दिले.




यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, राजेसाहेब काका पवळ, एड. राज पाटील, अशोकराव निपटे, राजाभाऊ महाराज कुटे, समन्वयक दिनेश गुळवे, राहुल लोंढे, देविदास चव्हाण, गोरक्षनाथ येवले, माजी पंचायत समिती सदस्य दिगंबर येवले, कुलदीप करपे, संभाजीराव पवळ, अनिलराव पवळ, प्रल्हाद गाडे, शामराव घुगे, महादेव रडे, विजयकुमार करपे, मधुकर थोरात, मुकुंद परदेशी, गणेश कोळेकर, आदीनाथ जोगदंड, काशीनाथ जोगदंड, सुभाषराव टाकसाळ, ज्ञानदेव शिंगटे, भागवत केकरे, विकास जोगदंड, रामहरी जोगदंड, संतोष रडे, कल्याण नवले आदींसह शेतकरी उपस्थित होते. शिरूर ते माजलगाव पर्यंत सिंदफणा पाणीदार व्हावी, बारमाही सिंचनाची सोय होऊन दुष्काळ कायमचा नाहिसा व्हावा यासाठी जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावेत, मातोरी, कोळगाव, मादळमोही, गढी, सिरसदेवी, तालखेड, एकदरा शिवारातून उपकालवा करावा यासह इतर मागण्यांसाठी सिंदफणा पट्ट्यातील १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या मागण्या शासनाने मंजूर कराव्यात, अर्थसंकल्पात निधी द्यावा, कालबद्ध योजना पूर्ण करव्यात यासह इतर मागण्यांसाठी येत्या तीन मार्चपासून गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे १४० गावातील ग्रामस्थांचे उपोषण करण्यात येणार आहे. यासाठी सर्व आंदोलक शेतकऱ्यांनी एकत्र येत जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन दिले. सदरील शेतकऱ्यांचे प्रश्न शासनाकडे मांडू असे यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक म्हणाले. यानंतर शेतकऱ्यांनी पोलीस अधीक्षक यांनाही निवेदन दिले.

# सहा महिन्यांपासून पगार रोखला; हमालांचे काम बंद आंदोलन



दिंद्रुड । प्रतिनिधी

गेल्या सहा महिन्यांपासून हमालीची मजुरी रोखली गेल्याने दिंद्रुड येथील शासकीय धान्य गोदामाच्या हमालांनी बेमुदत काम बंद आंदोलन बुधवारी सुरू केले. जोपर्यंत मजुरीचा पगार मिळणार नाही तोपर्यंत काम करणार नसल्याचा इशारा हमालांनी प्रशासनाला दिला आहे.

दिंद्रुड येथे शासकीय धान्य गोदाम आहे. येथी आठ हमालांचे गेल्या सहा महिन्यांपासून पगार झालेले नाहीत. आर्थिक परिस्थिती हालाखीचे असताना न होणारा पगार यामुळे परेशान झालेल्या हामालांनी बुधवारपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. मजुरीचे पैसे द्या तेव्हाच काम करू हा पवित्रा कामगारांनी घेतला आहे. गणेश आढाव, सुदाम ठोंबरे, रमेश किचमे, परमेश्वर चव्हाण, राम पारेकर, राजेभाऊ कोरडे,अश्रुबा किचमे, बालाजी हरकळ या हमालांनी बुधवारपासून प्रशासना विरोधात आंदोलन सुरू केले आहे.

राज्य लोकतंत्र
गुरूवार, दि.२७ फेब्रुवारी २०२५ | ६

# अनिलदादांनी बीडमध्ये युवासेना मजबूत करावी- निलेश शिंदे

## युवा विजय मराठवाडा दौऱ्यात बीडमध्ये पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न!

बीड । प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचा आशीर्वाद घेऊन महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख पुर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शन नेतृत्वाखाली युवासेना आयोजित युवाविजय मराठवाडा दौरा पार पडतो आहे. या दौऱ्यात ठिकठिकाणी पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठका देखील घेण्यात येत आहे. अगदी याप्रमाणेच बीडमध्ये देखील आज युवाविजय दौऱ्यातील आढावा बैठका संपन्न होत आहेत. शिवसेना पक्षाला ताकद देण्यासाठी, पक्षाची ताकद वाढविण्यासाठी आम्ही सर्व युवांनी वज्रमुठ आवळली असून आता चाळीस वर्ष राजकारणात राहून शिवसेना पक्ष बांधणीसाठी सर्वोपरी योगदान देणारे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी एक मोठा भाऊ या नात्याने बीड जिल्हा युवासेनेचे पालकत्व स्वीकारून युवासेना मजबूत करावी असे अहवान युवसेना




मराठवाडा सचिव निलेश भाऊ शिंदे यांनी युवाविजय मराठवाडा दौऱ्याच्या पदाधिकारी आढावा बैठकीत केले. काल दि. २५ फेब्रुवारी रोजी बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे युवाविजय मराठवाडा दौऱ्यातील पदाधिकारी आढावा बैठक संपन्न झाली. या आढावा बैठकीसाठी युवासेना मराठवाडा सचिव निलेश भाऊ शिंदे, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, युवासेना मराठवाडा युवती निरीक्षक आकांक्षाताई चौगुले, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव,

युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्नील भैय्या गलधर उपस्थित होते. जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवासेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी आपल्या प्रस्ताविकता शिवसेना, युवासेना पदाधिकाऱ्यांचं स्वागत करत युवासेनेच्या कार्याचा आढावा मांडला व पुढील वाटचालीसाठी आम्हाला सहकार्य मार्गदर्शनाची आवश्यकता असून आम्ही पूर्ण ताकदीने बीड जिल्ह्यात युवासेनेची ताकद वाढवू असा शब्द दिला. युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी आपल्या भाषणामध्ये अनिल दादा हे मला गुरुस्थानी असल्याचे नमूद केले तर विनाकारण आमच्या दोघांमध्ये कुठलेही वैर नसताना पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये गैरसमज निर्माण झालेले असल्याचे मत बाजीराव चव्हाण यांनी मांडले. युवासेना मराठवाडा युवती निरीक्षक आकांक्षा ताई चौगुले यांनी युवा हा राज्याच्या आणि देशाच्या विकासाचा मजबूत पाया असल्याने युवसैनिकांनी मोठ्या ताकदीने युवासेनेची ताकद वाढवण्या बाबत मार्गदर्शन केले. यानंतरयुवासेना आयोजित युवा विजय मराठवाडा दौऱ्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली व याबरोबरच बीडमध्ये युवा विजय मराठवाडा दौऱ्याची सांगता देखील झाली. दरम्यान आढावा बैठकीसाठी जिल्हाभरातून शिवसेना, युवसेना, शेतकरीसेना महिला आघाडीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### युवासेनेच्या सहकार्यासाठी सदैव तत्पर- जगताप

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा यांनी आपल्या भाषणात युवसैनिकांना संबोधित करताना सांगितले की, आपण महाराष्ट्रवासियांना आदर्शवत असणाऱ्या एकनाथजी शिंदे साहेबांचे कार्यकर्ते आहोत. कार्यकर्त्यांना वेळ देणे, त्यांना जपने हा शिंदे साहेबांचा स्वभाव आहे. शिंदे साहेबांनी मुख्यमंत्री असताना अडीज वर्षात अठरा अठरा तास सर्व सामन्यांसाठी केलेल्या कार्यामुळे आपल्याला गावख्येड्यात ओळख मिळाली आहे. शिंदे साहेबांमुळेच समाजात आपला आदर सन्मान वाढला आहे. हे युवसैनिकांनी लक्षात घेऊन युवासेनेची वाटचाल सुरु ठेवावी. याबरोबरच संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे हे शिवसेनेचे आणि युवासेनेचे सर्व कामकाज पाहताना शिवसैनिकांना आणि युवासैनिकांना मोठा आधार देण्याचा सर्वोपरी प्रयत्न करतात. एवढेच नाही तर त्यांचं सातत्याने म्हणणं असतं की, जो काम करेगा वो आगे आयेगा, अगदी याच प्रमाणे युवा सैनिकांनी आपल्या कामातून मोठं व्हावं आणि आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब, डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना ताकद द्यावी. युवासेना प्रमुख पूर्वेशजी सरनाईक साहेब हे देखील युवासेनेला भरभक्कम साथ देण्यासाठी सदैव पुढाकार घेऊन काम करतात, युवासैनिकांना पुढे आणण्यासाठी नियमित धडपड करतात यामुळे युवासैनिकांनी कुठलाही किंतु परंतु न ठेवता पूर्ण ताकदीने पक्ष बांधणीच काम करावं. मी २००६ पासून शिवसेनेचे इमानदारीने काम केले असून इथून पुढे जिथे जिथे युवासेनेला माझी गरज भासेल तिथे तिथे मी युवासेनेला सहकार्य करण्यासाठी उपस्थित राहिल. असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात युवासेनेला सांगितले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करणार–पिंगळे,बहिर



बीड । प्रतिनिधी

युवा विजय दौरा महाराष्ट्राचा झंजावात युवा शक्तीच्या माध्यमातून मा. ना. एकनाथ शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी सध्या संपूर्ण महाराष्ट्रात युवा सेनेचे दौरे सुरु आहेत. मराठवाड्यातील लातूर व परभणी जिल्ह्यात युवा विजयी महाराष्ट्र दौरा हा बीडच्या पोरांनी चांगलाच गाजवला.महाराष्ट्र चे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व संसद रत्न डॉ श्रीकांत शिंदे साहेब, युवासेना कार्यध्यक्ष पुर्वेश सरनाईक साहेब यांच्या संकल्पनेतून व युवासेना मुख्य सचिव राहुल लोंढे साहेब युवासेना सचिव किरण साळी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हा युवा विजयी दौरा महाराष्ट्र भर सुरू आहे. युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे व बीड लोकसभा निरीक्षक सागर विजय बहिर यांची नेमणूक या जिल्ह्याच्या दौऱ्या निमित्त केली गेलेली होती . लातूर व परभणी जिल्ह्यातील युवा सेना दौऱ्यात युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा मराठवाडा निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे व बीड लोकसभा निरीक्षक सागर विजय बहिर यांनी लातूर जिल्ह्यातील ६ विधानसभा आणी परभणी जिल्ह्यातील ४ विधानसभा क्षेत्रात जाऊन युवकांच्या भेटी घेतल्या, या भेटीतून तळागळतील युवकांपर्यंत जाऊन युवा सेनेचे कार्य ◀◀ पान ३ वर

# रंजना आणि गोवर्धन दराडे दाम्पत्याला ‘काकाई सेवा गौरव पुरस्कार’ प्रदान

बीड । प्रतिनिधी

समाजातील अनाथ, बेघर, भटके-विमुक्त, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची मुले आणि कैद्यांच्या मुलांसाठी अतुलनीय कार्य करणाऱ्या रंजना आणि गोवर्धन दराडे या समाजसेवी दाम्पत्याला ‘काकाई सेवा गौरव पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले. संस्कृती विद्यालय आणि विवेकवर्धनी गुरुकुलच्या माध्यमातून डॉ. दत्ताजी नलावडे यांनी या पुरस्काराचे आयोजन केले होते.




त्याग आणि सेवाभावाचे प्रतीक दराडे दाम्पत्य

रंजना आणि गोवर्धन दराडे यांनी गरजू आणि वंचित मुलांसाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले आहे. स्वतःची जमीन आणि घर विकून त्यांनी सेवा आश्रम उभारला, जिथे अनेक अनाथ आणि दुर्लक्षित मुलांना आधार, शिक्षण आणि चांगले भविष्य मिळत आहे. त्यांच्या त्यागमूर्ती सेवाभावामुळे ते समाजासाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहेत.

मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

हा पुरस्कार मा. नितीनजी कोटेचा, मा. निलेशजी पाटील ( इन्स्पेक्टर, वर्धा), मा. गोरक्षनाथ आबूज सर (शिवशंभू प्रतिष्ठान, देवगिरी प्रांत), डॉ. उजेगर साहेब, डॉ. दत्ताजी नलावडे, मातोश्री सिंधुताई नलावडे, दिगंबर नलावडे आणि इतर मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी दराडे दाम्पत्याच्या कार्याची प्रशंसा करत, त्यांच्या पुढील सामाजिक उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

समाजसेवेसाठी प्रेरणादायी योगदान

दराडे दाम्पत्याने अत्यंत कठोर परिश्रम आणि अपार त्यागाने वंचित, निराधार आणि दुर्लक्षित मुलांसाठी नवा आशेचा किरण निर्माण केला आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजातील दुर्बल घटकांना आत्मसन्मानाने जगता येण्याची संधी मिळत आहे. पसायदान सेवा प्रकल्प, संस्कृती विद्यालय आणि विवेकवर्धनी गुरुकुलतर्फे दराडे दाम्पत्याचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

# लेखक अजिनाथ सासवडे यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील खुटेफळ उरण येथील वीर वाजेकर महाविद्यालयाचे मानसशास्त्र विषयाचे प्राध्यापक व खुंटेफळ (वाटेफळ) येथील रहिवाशी श्री. योगेश कुलकर्णी यांनी प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांच्या समवेत . . . ., . . आणि . . च्या सत्र दोनच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बदललेल्या अभ्यासक्रमावर आधारीत इंग्रजी भाषेत लिहिलेल्या – अर्थात पायाभूत वर्तन कौशल्य या पुस्तकाचे प्रकाशन लोणी सय्यदमीर येथील लेखक अजिनाथ सासवडे यांच्या हस्ते पार पडले.

विद्यार्थ्यांच्या वर्तनाला योग्य दिशा मिळण्यासाठी या पुस्तकाचा निश्चित उपयोग होईल असे गौरवोद्गार सरांनी यावेळी काढले. या प्रकाशनासाठी लोणी गावचे सरपंच संजय रक्ताटे सर, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र आबा वाळके, सुभाष शेठ वाळके, आजिनाथ काका बेल्हेकर, ह.भ.प. घनश्याम सासवडे, प्रा. दादासाहेब वाळके , निळकंठ काका रक्ताटे यांसह लोणी येथील अनेक मान्यवर व शिक्षणप्रेमी ग्रामस्थ प्रकाशनाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.







बीड –वाढदिवसाच्या निमित्ताने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या तुळापूर येथील समाधीस्थळी अभिवादन करताना अ. भा. छावाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक रोमन तसेच वाढदिवसानिमित्त अ. भा. छावाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांना शुभेच्छा देताना माजी मंत्री, आ. प्रा.डॉ. तानाजीराव सावंत तसेच बीडचे आ. संदीप क्षीरसागर आदी.

# राष्ट्रीय ॲबकस स्पर्धेतील यशाबद्दल आरूष दराडेचा डेप्युटी सीईओनीं केला सत्कार



दिंद्रुड । प्रतिनिधी

पोद्दार स्कुलचा विद्यार्थी आरूष दराडे याने राष्ट्रीय ॲबकस स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून,शाळेचे नावलौकिक केले.याबद्दल बीड जि.प.उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते आरूष याचा सत्कार करून गौरविण्यात आले.

बीड शहरातील प्रसिद्ध असलेल्या पोद्दार इंग्लिश स्कुल येथे शिक्षण घेत असलेला आरूष दराडे हा धारूर तालुक्यातील ग्रामीण भागातुन आलेला विद्यार्थी आहे.राष्ट्रीय ॲबकसच्या वतीने घेण्यात आलेल्या ॲबकस स्पर्धेत विद्यालयाच्या वतीने आरूष दराडे सहभाग घेतला होता.या स्पर्धेत आरूष याने घवघवीत यश संपादन करून स्वतःसह पोद्दार स्कुलचा नावलौकिक केला.याबद्दल शाळेच्या वतीने घेण्यात आलेल्या एका शानदार समारंभात बीड जि.प.उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते आरूष दराडे याचा सत्कार करून गौरविण्यात आले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्याचा असा गौरव झाल्याबद्दल त्याच्या गावातील नागरिकांनी आनंद व्यक्त करत आरूष दराडे याचे अभिनंदन केले.

# धाराशिवच्या जिल्हाधिकारीपदी कीर्तीकुमार पुजार

कळंब । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या नव्या जिल्हाधिकाऱ्यांची प्रतीक्षा अखेर संपली असून, राज्य सरकारने कीर्ती किरण पुजार यांची धाराशिव जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.याआधी रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले पुजार आता धाराशिवच्या प्रशासकीय नेतृत्वाची धुरा सांभाळणार आहेत.



नव्या जिल्हाधिकाऱ्याकडून अपेक्षा वाढल्या.

धाराशिव चे माजी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांची बदली सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी झाल्याने गेल्या आठवड्याभरापासून या पदासाठी नव्या नावाची उत्सुकता होती.अखेर राज्य सरकारने कीर्ती किरण पुजार यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे .धाराशिव जिल्ह्यातील विकास कामे कृषी प्रकल्प, पाणीपुरवठा योजना तसेच नागरिक सुविधा संदर्भातील अनेक महत्त्वाचे निर्णय प्रलंबित आहेत. नवीन जिल्हाधिकारी म्हणून कीर्ती किरण पुजार यांच्या नेतृत्वाखाली या कामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कीर्ती किरण पुजार -एक सक्षम प्रशासक कीर्ती किरण पुजार हे २०१७चे आयएएस अधिकारी असून, त्यांनी यूपीएससी परीक्षेत ११५ वा क्रमांक मिळवून प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी प्रशासनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. याआधी रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी तीन वर्ष काम पाहिले. त्यांचा कार्यकाळात विकास प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावण्यासाठी त्यांची प्रशंसा प्रझाली होती.धाराशिव जिल्हाधिकारी म्हणून ही त्यांची पहिलीच नियुक्ती असून ते लवकरच पदभार स्वीकारतील. नागरिकांमध्ये उत्सुकता नव्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नियुक्तीनंतर धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली प्रशासन कोणते नवे निर्णय घेते, विकास प्रक्रियेत कोणते धोरणात्मक बदल करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी किशन भदर्गे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्ह्याच्या ग्रामीण बीड जिल्हाध्यक्षपदी वडवणी येथील पत्रकार अँड. विनायकराव जाधव यांची तर उपाध्यक्षपदी सोमेश्वर सोनटक्के, प्रकाशराव काशीद तर सचिवपदी बालासाहेब फपाळ , कार्याध्यक्षपदी किसनराव भदरगे यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संजय भोकरे यांच्या आदेशानुसार तर सरचिटणीस विश्वासराव आरोटे साहेब,प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली १८ फेब्रुवारी रोजी तेलगाव येथे सायंकाळी ४:०० वाजता माजलगाव, धारूर,वडवणी कार्यक्षेत्रातील पत्रकारांची निवडी संदर्भात व्यापक बैठक झाली. या बैठकीमध्ये सर्वानुमते या कार्यक्षेत्रासाठी बीड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी अँड विनायक जाधव यांची तर उपाध्यक्षपदी सोमेश्वर सोनटक्के, प्रकाशराव काशिद ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyalokanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

A

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरूवार, दि.२७ फेब्रुवारी २०२५ । पान ७

# स्वारगेट अत्याचार प्रकरणावरुन रोहित पवार आक्रमक

## खासदार मुरलीधर मोहोळांच्या पोलीस आयुक्तांना सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील मध्यवर्ती भागातील स्वारगेट बसस्थानकामध्ये तरुणीवर अत्याचाराची धक्कादायक घटना घडली आहे. २६ वर्षीय तरुणीवर पहाटेच्या साडेपाचच्या सुमारास ही अत्याचाराची घटना घडली. मुलीला फसवून पार्क केलेल्या शिवशाही बसमध्ये बसवून नराधमाने अत्याचार केला. पुण्यामध्ये हा प्रकार घडल्यामुळे सर्वांनी रोष व्यक्त केला आहे. शरद पवार गटाचे नेते व आमदार रोहित पवार यांनी फटकारले आहे. तर पुण्याचे खासदार व केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे पोलीस आयुक्तांना सूचना दिल्या आहेत.**





पुण्यातील स्वारगेट अत्याचार प्रकरणावर आमदार रोहित पवार यांनी रोष व्यक्त केला आहे. सोशल मीडियावर पोस्ट करुन त्यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना मागणी केली आहे. रोहित पवार यांनी लिहिले आहे की, पुण्यात स्वारगेट बस स्थानकात पहाटेच्या सुमारास बसमध्ये मुलीवर अत्याचार झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली. ज्या ठिकाणी ही घटना घडली ते स्वारगेट बसस्थानक राज्यातील प्रमुख बस स्थानकांपैकी एक असून समोरच पोलीस स्थानकही आहे. तरी एका सराईत गुन्हेगाराकडून बिनदिक्कत अत्याचार करण्यात आल्याने सार्वजनिक स्थळांवरील महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, असे मत आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले आहे.

पुढे त्यांनी लिहिले आहे की, संबंधित घटनेतील मुख्य आरोपीला अटक करण्याबरोबरच राज्यभरात अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून राज्य सरकारकडून कठोर उपाययोजना केल्या जाव्यात. इतकेच नाही तर महिला सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा असणारा शक्ती कायदा राज्यात लागू करण्याबाबत तत्काळ निर्णय होईल, ही अपेक्षा! अशा शब्दांत रोहित पवार यांनी लिहिले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे मागणी केली आहे.

त्याचबरोबर या प्रकारावर पुण्याचे खासदार व राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी देखील पुण्याचे पोलीस आयुक्तांना लवकरात लवकर अटक करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मुरलीधर मोहोळ यांनी पुणे स्वारगेट परिसरात तरुणीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर आरोपीचा शोध घेऊन त्याला तत्काळ अटक करण्याच्या सूचना पोलीस आयुक्तांना केलेल्या आहेत. माझ्या शहरातील कायदा सुव्यवस्था आम्ही बिघडू देणार नाही, अशी प्रतिक्रिया केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. पुण्यातील स्वारगेट अत्याचार प्रकरणाबाबत पुणे पोलिसांनी माहिती दिली आहे. आम्ही सीसीटीव्ही फुटेज काढलं. आरोपीची ओळख पटली आहे. आरोपी शिरुर गावचा आहे. त्याच्यावर ३९२ चा गुन्हा दाखल आहे. आरोपीचा शोध सुरु आहे. कालपासून आठ टीम काम करत आहेत. पोलिसांच पेट्रोलिंग सुरु असतं. पण प्रत्येक बस पोलीस चेक करु शकत नाहीत. ही बस आतमध्ये होती. घटनेनंतर मुलगी बसमध्ये बसून निघून गेली. तिथे आरडाओरडा केला असता, तर तिला काही मदत मिळू शकली असती असे मत पुणे पोलिसांनी व्यक्त केले आहे.

# आधी गोळीबार अन् मग तलवारीने वार; शास्त्रीनगरमध्ये तरुणाचा खून

पुणे: पूर्ववैमनस्यातून टोळक्याने तरुणावर पिस्तुलातून गोळीबार करत तलवारीने वार करून खून केल्याची घटना कोथरूड भागातील शास्त्रीनगर परिसरात घडली आहे. गौरव अविनाश थोरात (वय २२, रा. मराठा महासंघ सोसायटी, शास्त्रीनगर, पौड रस्ता, कोथरूड) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.



याप्रकरणी दिनेश भालेराव (वय २७), सोहेल सय्यद (वय २४), राकेश सावंत (वय २४), साहिल वाकडे (वय २५), बंड्या नागटिळक (वय १८), लखन शिरोळे (वय २७), अनिकेत उमाप (वय २२), यांच्यासह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल केलेल्या आरोपींमध्ये एका अल्पवयीनाचा समावेश आहे. याबाबत सागर वसंत कसबे (वय ४७) यांनी कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दरम्यान, कोथरूड भागात बुधवारी संगणक अभियंता तरुणाला गज्या मारणे टोळीतील गुंडांनी मारहाण केल्याची घटना ताजी असतानाच शास्त्रीनगर परिसरात झालेल्या खुनाच्या घटनेमुळे परिसरात घबराट उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरव आणि आरोपी सोहेल यांच्यात वाद झाले होते.

गौरवने आरोपीपैकी एकाच्या पत्नीबरोबर वाद घातला होता. दोन दिवसांपूर्वी गौरव आणि सोहेल यांच्यात पुन्हा वाद झाला होता. रविवारी मध्यरात्री गौरव हा शास्त्रीनगर येथील दत्त मंदिराजवळ मित्रांसोबत बसला होता. त्या वेळी सोहेल सय्यद हा साथीदारांसह तिथे आला. सोहेलने त्याच्याकडील देशी बनावटीच्या पिस्तुलातून गौरवच्या दिशेने गोळी झाडली. गौरवला गोळी लागली नाही. त्यानंतर आरोपींनी तलवार आणि कोयत्याने गौरववर हल्ला केला.आरोपींनी त्याच्यावर वार केले. डोके, मान आणि पोटात वार करण्यात आल्यामुळे गौरव गंभीर जखमी झाला होता. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच तो मरण पावला होता. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

# आमदार शरद सोनवणे शिवसेनेत प्रवेश करणार; ऊउच् शिंदेंच्या उपस्थितीमध्ये होणार पक्षप्रवेश

नारायणगाव । प्रतिनिधी

किल्ले शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्याचे अपक्ष आमदार शरद सोनवणे, नारायणगावचे माजी लोकनियुक्त सरपंच व विद्यमान उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे कार्यकर्त्यांसह तसेच शिरूर लोकसभा मतदारसंघातील जबाबदार पदाधिकारी असे सुमारे ४०० कार्यकर्ते शिवसेनेचे नेते व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत पक्षप्रवेश करणार आहे. अशी माहिती जुन्नर चे अपक्ष आमदार शरद सोनवणे, उपसरपंच योगेश उर्फ बाबूभाऊ पाटे यांनी नारायणगाव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी माजी सरपंच सचिन वाळुंज, प्रदीप देवकर, माजी उपसरपंच संतोष वाजगे, विकास तोडकरी, अजित वाजगे, आरिफ आतार, ड. राजेंद्र कोल्हे, गणेश पाटे, नंदू अडसरे, अक्षय वाव्हळ, संतोष दांगट आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

शिवसेनेचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शुक्रवारी (दि.२८) शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर येत असून दुपारी चार वाजता त्यांचे जुन्नर येथे आगमन होणार आहे. त्यानंतर गोद्रे (ता.जुन्नर) येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा जगातील सर्वात उंच पुतळा उभारण्याचे काम चालू आहे. त्या ठिकाणी शिंदे भेट देणार असून इंजिनीयर, डिझायनर व ठेकेदार यांच्याकडून पुतळ्यासंबंधी माहिती घेणार आहे.

सायंकाळी ६ वाजता नारायणगाव येथील पूर्व वेशी जवळ आयोजित केलेल्या महामेळाव्यात शिवसेना नेते एकनाथ शिंदे मार्गदर्शन करणार असून त्यांच्या उपस्थितीत जुन्नर चे विद्यमान अपक्ष आमदार शरद सोनवणे, उपसरपंच बाबूभाऊ पाटे, अन्य पक्षातील पदाधिकारी, शेकडो कार्यकर्ते शिवसेना पक्षात प्रवेश करणार आहेत.

सर्वसामान्यांच्या भावना विचारात घेऊन तसेच भविष्यातील राजकारण पाहता पुणे जिल्हा एक विचाराने शिवसेनेच्या दिशेने दमदार पाऊल टाकणार आहे. पुढील काळात जिल्हा परिषद, नगरपंचायत, पंचायत समिती च्या निवडणुका लढविताना योग्य मांडणी करून लढविणार आहोत. जिल्ह्यात शिवसेनेचाच वरचष्मा कसा राहील असा प्रयत्न करणार असल्याचे आमदार सोनवणे यांनी सांगितले. आमच्यासाठी धनुष्यबाण महत्त्वाचा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक युती म्हणून लढविली जाईल असे वाटत नाही. तर राष्ट्रवादी विरुद्ध शिवसेना अशी निवडणूक होईल असे सांगून कार्यकर्त्यांना संधी मिळेल आणि संघटना वाढीस लागेल असा विश्वास व्यक्त केला.

# पुण्यात स्वारगेट बसस्थानकात अत्याचार झालेल्या पीडित तरुणीचा मेडिकल रिपोर्ट आला समोर

पुण्याच्या स्वारगेट बस स्थानकात शिवशाही बसमध्ये तरुणीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. आरोपी फरार असून पोलिसांची ८ पथकं त्याच्या मागावर आहेत. दरम्यान पीडित तरुणीचा मेडिकल रिपोर्ट समोर आला असून पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आला आहे. या मेडिकल रिपोर्टकडे साऱ्यांचं लक्ष लागलं आहे.

पुण्यातील स्वारगेटमधील डेपोमध्ये २६ वर्षीय तरुणीवर अत्याचाराची घटना घडली. अत्याचाराची घटना घडल्यानंतर तरुणीने पोलिसांत धाव घेतली. पोलिसांत तक्रार नोंदवल्यानंतर काही वेळेनंतर मेडिकल रिपोर्टसाठी रुग्णालयात नेण्यात आलं. त्यानंतर आता पीडित तरुणीचा मेडिकल रिपोर्ट समोर आला आहे.

मेडिकल रिपोर्ट पोलिसांना देण्यात आला आहे. ससून रुग्णालयाने पीडित तरुणीचा वैद्यकीय अहवाल पोलिसांना सुपूर्द केला आहे. मेडिक रिपोर्टमधून अनेक गोष्टी स्पष्ट होणार आहे. पोलिसांना तपासात मेडिकल रिपोर्टची मदत होणार आहे. या मेडिकल रिपोर्टमुळे कोण-कोणते खुलासे होणार, याकडे साऱ्यांचं लक्ष लागलं आहे.

२६ वर्षीय तरुणीवरील अत्याचार

पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात २६ वर्षीय तरुणीवरील अत्याचाराच्या घटनेने खळबळ उडाली आहे. पुण्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या घटना वाढत आहेत. त्यात आता महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर राज्यभारात संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान तरुणीवर अत्याचाराच्या घटनेची महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दखल घेतली आहे. माणसांच्या कळपात हिंस्त्र श्वापदे वावरतात, अशा शब्दात महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी संताप व्यक्त केला आहे.

नेमकं काय म्हणाल्या रुपाली चाकणकर?

पुण्याच्या स्वारगेट बस स्थानकावर काल सकाळी एका तरुणीवर बसमध्ये अत्याचार झाल्याची घटना, या अनुषंगाने मी स्वतः पोलीस आयुक्त तसेच तपास अधिकारी या सगळ्यांशी बोलले आहे.सीसीटीव्ही फुटेजही मी स्वतः पाहिले आहे.ही तरुणी आरोपी सोबत काही वेळ बोलत होती आणि त्याने तिची दिशाभूल करून,तिला खोटं सांगून बस मध्ये नेलं आणि अत्याचार केला. पुण्याच्या स्वारगेट बस स्थानकावर काल सकाळी एका तरुणीवर बसमध्ये अत्याचार झाल्याची घटना, या अनुषंगाने मी स्वतः पोलीस आयुक्त तसेच तपास अधिकारी या सगळ्यांशी बोलले आहे.सीसीटीव्ही फुटेजही मी स्वतः पाहिले आहे.ही तरुणी आरोपी सोबत काही वेळ बोलत होती आणि त्याने तिची दिशाभूल करून,तिला खोटं सांगून बस मध्ये नेलं आणि अत्याचार केला. ती मुलगी काही वेळ त्याच्याशी बोलताना सीसीटीव्हीत दिसत आहे तर अनोळखी व्यक्तींशी बोलताना काळजी घेणे खूप गरजेचे आहे.शासकीय यंत्रणा,चौकशी कक्ष हे मदतीला असतातच तर त्यांच्याशी संवाद साधायला हवा होता.मात्र दुर्दैवाने या मुलीने अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवला आणि पुढे हा गंभीर आणि वेदनादायी प्रसंग घडला.

# रांजणगावात युवकाला निर्जनस्थळी नेऊन लुटले; रोख रकमेसह मोबाईल नेला अन्

शिक्रापूर : रांजणगाव गणपती (ता.शिरूर) येथील गणपती मंदिराच्या पार्किंगजवळ केवल इंगोले हा तरुण उभा असताना त्याला निर्जनस्थळी नेऊन लुटले. त्यामध्ये त्याचा मोबाईल व दुचाकी जबरदस्तीने काढून घेऊन पाच हजार रुपये घेतले. त्यानंतर दुचाकी परत दिल्याचा प्रकार समोर आला. याप्रकरणी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे टिन्या शेळके, तुषार अहिरे, अक्षय जाधव व साकिब शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रांजणगाव गणपती (ता.शिरूर) येथील गणपती मंदिराच्या पार्किंगजवळ केवल इंगोले हा उभा असताना टिन्या शेळके व त्याच्या साथीदारांनी केवल याला त्याच्या दुचाकीसह (एमएच २९ बीएल ५७०७) भांबर्डे रोड येथील एका पडीक बिल्डिंगमध्ये घेऊन गेले. तेथे जात त्याला हाताने मारहाण करत शिवीगाळ दमदाटी करून त्याच्याजवळील मोबाईल व दुचाकी जबरदस्तीने काढून घेतली. त्यानंतर काही वेळाने केवल याच्याकडून पाच हजार रुपये घेऊन त्याची दुचाकी त्याला परत दिली आणि पाच हजार रुपये व मोबाईल घेऊन सर्वजण पळून गेले.

दरम्यान, घडलेल्या घटनेबाबत केवल परमेश्वर इंगोले (वय २४ वर्षे रा. रांजणगाव गणपती ता. शिरूर जि. पुणे मूळ रा. लोणीसा ता. डिग्रस जि. यवतमाळ) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी टिन्या शेळके, तुषार अहिरे, अक्षय जाधव, साकिब शेख (पूर्ण नाव पत्ता माहित नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अविनाश थोरात हे करत आहे.

चोरट्यांचा धुमाकूळ सुरुच

राज्यात लुटमार करणाऱ्या चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून लुटमारीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. एरंडवणे परिसरातील डीपी रस्त्यावर रनिंग करणाऱ्या तरुणाला तलवारीचा धाक दाखवून लुटणाऱ्या चोरट्यांना जेरबंद करण्यात अलंकार पोलिसांना यश आले. या चोरट्यांकडून तलवार, दुचाकी, दोन सोनसाखळ्या, पेंडेंट असा २ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# लिंगभाव संवेदनीकरण कार्यशाळेत १०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**पुणे । प्रतिनिधी**

कोंढवा (पुणे) येथील के. जे. शैक्षणिक संकुलाचे ट्रिनिटी अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयात मूल्यशिक्षण कार्यशाळेअंतर्गत 'लिंगभाव संवेदनीकरण' या जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना तसेच विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यशाळेत बाया कर्वे स्त्री अभ्यास आणि संशोधन केंद्रातील लिंग अभ्यास विभाग प्रमुख समृद्धी पानसे यांनी सहभागी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यशाळेत विविध महाविद्यालयातील १०० मुला-मुलींनी सहभाग नोंदविला होता. शिबिर आयोजनाकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजित औटी यांनी मार्गदर्शन केले, तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. जितेश धुळे तसेच विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. शरद भोसले यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून ईशिका राऊत, वैष्णवी मिडगुले, तेजस ठाकरे, आविष्कार परभाणे, ऋषिकेश तांबे व शौनक खैरनार यांनी काम केले.



# शिक्षकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग; कोळगाव येथील धक्कादायक प्रकार

**शिरूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोळगाव डोळस येथे शिक्षकानेच चौथीत शिकत असलेल्या अल्पवयीन एका विद्यार्थीनीशी गैरवर्तन करीत विनयभंग केला आहे. संशयित शिक्षकावर पोस्कोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शनिवार (दि.२२) रोजी घडली आहे. याबाबत मुलीच्या पालकांनी शिरुर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.



बाळासाहेब धोंडीबा गुंजाळ (वय ४५, ता.शिरूर) असे गुन्हा दाखल झालेल्या शिक्षकाचे नाव आहे. शिरुर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोळगाव डोळस येथील शाळेत शिक्षक बाळासाहेब धोंडीबा गुंजाळ हा अध्यापनाचे काम करीत आहे. तो चौथीत शिकणाऱ्या मुलींना वर्ग झाडून काढण्यास तसेच इतर कामे सांगत असे. मुली वर्ग झडताना तो त्यांच्याशी गैरकृत्य करीत होता. असे प्रकार त्याने अनेक वेळा केला आहे. तो मुलीला पट्ट्याने मारण्याची व जीवे मारण्याची धमकी देत होता. त्यामुळे सदर पीडित मुलगी शाळेत जाण्यास घाबरत होती. पालकांनी विश्वासात घेत विचारपूस केल्याने तिने सर्व प्रकार सांगितला आहे. यामुळे संतप्त पालकांनी शाळेला टाळे ठोकत शिक्षकाला चोप दिला. तसेच गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार केली. शिक्षण विभागाने चौकशी समिती नेमली असुन चौकशी अंती निलंबनाची कारवाई केली जाणार असल्याचे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांनी सांगितले. पुढील तपास शिरूर पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# शिवशाही नावाखाली लॉजिंगरोज बलात्कार; वसंत मोरेंचे तोडफोड करत गंभीर आरोप

पुणे : पुण्यामध्ये स्वारगेट बसस्थानकामध्ये धक्कादायक घटना घडली आहे. पहाटेच्या सुमारास २६ वर्षीय तरुणीवर शिवशाही बसमध्ये अत्याचार करण्यात आला. या घटनेतील आरोपीचा फोटो समोर आला असून दत्तात्रय रामदास गाडे असे या नराधमाचे नाव आहे. या घटनेचे राज्यभरातून निषेध व्यक्त करण्यात येत आहे. पुण्यामध्ये ठाकरे गटाने देखील आक्रमक पवित्रा घेतला आहे. ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनी स्वारगेट आगाराची तोडफोड केली असून गंभीर आरोप केले आहेत.

गावी निघालेल्या तरुणीवर शिवशाही बसमध्ये अत्याचार करण्यात आला. तरुणीला फसवून नराधमाने तिला बंद असलेल्या बसमध्ये चढवले. यामुळे पुण्यामध्ये आता तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे. हाकेच्या अंतरावर पोलीस स्टेशन असून देखील असे प्रकार घडत असल्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. या घटनेच्या विरोधात ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनी जोरदार टीका केली आहे. तसेच स्वारगेटमध्ये जाऊन बसेसची तोडफोड करुन निषेध देखील दर्शवला आहे.



वसंत मोरे यांनी स्वारगेट आगारामध्ये तीव्र आंदोलन केले आहे. यावेळी वसंत मोरे म्हणाले की, या लोकांनी चार बसेसचं लॉजिंग केलं आहे. याचा अर्थ असा होतो की याच सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत इथे रोज बलात्कार होतात. मीडियाने सगळ्या गोष्टी जर नीट पाहिल्या तर कळेल बसेस मध्ये कंडोम पडले आहेत. आगाराच्या मागच्या बाजूला या बसेस ठेवल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी या लोकांचा हात आहे. असा गंभीर आरोप उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते वसंत मोरे यांनी केला आहे. तसेच आगारातील कर्मचाऱ्यांवर, सुरक्षा रक्षकांवर वसंत मोरेंनी गंभीर आरोप केले आहेत.

ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनी आगार प्रमुखांच्या निलंबनाची देखील मागणी केली. ते म्हणाले की, आगार प्रमुखांचं निलंबन केलं पाहिजे आणि सुरक्षा रक्षकांवर कारवाई झाली पाहिजे. ३७६ क्रमांकाच्या कलमांखाली यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. बलात्कार होत असताना हे सगळे बघ्याच्या भूमिकेत होते का? आम्ही सुरक्षा केबीनची तोडफोड केली आहे. त्या समोर असलेल्या बसमध्ये तरुणीवर बलात्कार झाला आहे. हा विषय संवेदनशील आहे. आगाराच्या मागच्या बाजूला उभ्या असलेल्या बसेस पाहिल्या तर कळेल की इथे रोज बलात्कार होत आहेत. कुणाला तरी इथे आणलं जातं आहे आणि बलात्कार केला जातो आहे, अशी आक्रमक भूमिका वसंत मोरे यांनी घेतली आहे.

पुढे ते म्हणाले की, ज्या आरोपीने बलात्कार केला तो पाच दिवसांपासून स्वच्छतागृहाजवळ झोपत होता. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला हटकलं का नाही? सुरक्षा कर्मचारी या लोकांना मॅनेज होतात का? पोलीस यंत्रणा हाकेच्या अंतरावर असली तरीही ते पोलीस स्टेशन आगाराच्या बाहेर आहे. मात्र या ठिकाणी २० सुरक्षा कर्मचारी आहेत ते काय झोपा काढतात का? ते अशा प्रकारे काम करत असतील तर त्यांचं निलंबन केलं पाहिजे. शिवशाही या नावाखाली या लोकांनी थेट लॉजिंग तयार केलं आहे. त्या ठिकाणी साड्या पडल्या आहेत, कंडोम, कंडोमची पाकिटं पडली आहेत, असा धक्कादायक दावा वसंत मोरे यांनी केला आहे.

# चिखली, कुदळवाडीतील भंगार दुकानदारांना 'नो एन्ट्री

चाकण/ : चिखली, कुदळवाडी परिसरात अतिक्रमण कारवाईत व्यावसायिकदृष्ट्या विस्थापित झालेल्या व्यावसायिकांना आपल्या भागात जागा भाड्याने किंवा विकत देऊ नये, अशा सूचना चाकण एमआयडीसी टप्पा क्रमांक दोनमधील वासुली, शेलू, सावरदरी, वराळे आदी ग्रामपंचायतींनी नागरिकांना केल्या आहेत.

पिंपरी-चिंचवड शहराच्या कुदळवाडी, मोशी, चिखली आदी उपनगरांतील अतिक्रमणे महापालिकेने जमीनदोस्त केली आहेत. यात शेकडो एकरमधील अतिक्रमणे काढण्यात आली असून, अजूनही कारवाई सुरूच आहे. त्यामुळे येथील अनेक व्यावसायिकांचे व्यवसाय जागेअभावी ठप्प झाले असून, त्यांना दुसरी जागा शोधावी लागत आहे. येथील अनेक व्यावसायिकांनी आपला मोर्चा चाकण एमआयडीसीकडे वळविला असून, त्यातल्या त्यात टप्पा क्रमांक दोनमधील गावांना प्राधान्य दिले आहे.

पिंपरी-चिंचवड भागात या व्यावसायिकांनी अतिक्रमणे केली होती. त्यात काही बेकायदा व्यवसाय सुरू होते. काही बांगलादेशी नागरिकही आढळून आले होते. बेकायदा व्यवसायामुळे इंद्रायणी नदीपात्र दूषित होत गेले, तशी परिस्थिती आपल्या भागात येऊ नये या हेतूने नागरिकांनी अशा व्यावसायिकांना जागा विकत अथवा भाडेतत्त्वावर देऊ नये, असे पत्र काढून ग्रामपंचायतींनी नागरिकांना आवाहन केले आहे. नागरिकांनी अशा व्यावसायिकांना जागा दिल्या तर त्याला ग्रामपंचायत कुठल्याही प्रकारची सोयीसुविधा देणार नाही आणि त्यांची ग्रामपंचायत दफ्तरी नोंददेखील करणार नाही, असाही इशारा दिला आहे

cmyk